नेमणे आहे
नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.
१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

# दैनिक जनता आवाज

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ११९ | शनिवार, दि. २१ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## संमिश्र

### यूपीत वीज कोसळून १० जणांचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : गेल्या दोन दिवसांत राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, झारखंड, बिहार आणि उत्तर प्रदेशात मान्सून दाखल झाला आहे. मुसळधार पावसामुळे गुजरातमधील अहमदाबाद, वापी आणि राजकोटमधील रस्ते, घरे आणि दुकाने पाण्याखाली गेली. सावरकुंडला आणि राजुला येथील स्थानिक नद्या दुथडी भरून वाहत आहेत. उत्तर प्रदेशातील लखनऊ-सीतापूरमध्ये रात्रभर अधूनमधून पाऊस पडत होता. अमेठीमध्ये इतका पाऊस पडला की एसपी ऑफिस आणि गौरीगंज पोलिस स्टेशनमध्ये पाणी शिरले. अग्निशमन दलाच्या पथकाने एसपी ऑफिसमधून पाणी काढून टाकले. त्याच वेळी, वीज पडून २४ तासांत १० जणांचा मृत्यू झाला.

### लोकल प्रवासात महिलांची हाणामारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये महिलांमध्ये तुंबळ हाणामारी झाल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. ही घटना केव्हा व कोणत्या लोकलमध्ये घडली हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण रेल्वे पोलिसांनी त्याची चौकशी करण्यास सुरूवात केली आहे. लोकल ट्रेनची गर्दी ही मुंबईच्या जीवनरक्ताचाच एक भाग आहे. सकाळी व संध्याकाळी, लाखो प्रवासी आपल्या कामाच्या ठिकाणी, शाळा-कॉलेज किंवा घरी पोहोचण्यासाठी या ट्रेनमधून प्रवास करतात. यामुळे लोकलचे डब्बे कायम तुडुंब भरलेले असतात.

### अतिवृष्टीत १०० कोटींचा घोटाळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जालना** : जालना जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना करण्यात आलेल्या अनुदान वाटपात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तब्बल १०० कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप सत्ताधारी भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केला आहे. हा घोटाळा २०२२ ते २०२४ या कालावधीत झाला आहे. या प्रकरणी २१ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पण या प्रकरणी एसआयटी किंवा सीबीआय चौकशी करण्याची गरज आहे, असे म्हटले आहे.

### युतीत तूर्त रस नाही : संदीप देशपांडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

मुंबई : राजकीय वर्तुळात दोन्ही ठाकरे एकत्र येण्याबाबत चर्चा रंगल्या आहेत. उद्धव ठाकरे यांनीही पक्षाच्या वर्धापन दिनी आयोजित मेळाव्यात मनसेसोबतच्या युतीबाबत सकारात्मकता दर्शवली. असे असतात मनसेने मात्र सध्या युतीपेक्षा हिंदी सक्तीविरोधी आंदोलनावर लक्ष केंद्रीत केले आहे. यासंदर्भात बोलताना मनसे नेते संदीप देशपांडे यांनी आम्ही सध्या हिंदी सक्तीच्या विरोधासाठी रस्त्यावर उतरलो आहोत, युतीमध्ये फारसा रस नाही, असे स्पष्ट केले.

# राजद-काँग्रेसच्या कृती बिहारविरोधी : मोदी

## सिवान येथून १० हजार कोटींच्या प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन

जनता आवाज वृत्तसेवा

**सिवान : तुम्ही मिळून बिहारमधील जंगलराज नष्ट केले आहे. तरुणांनी बिहारच्या दुर्दशेच्या फक्त कथा आणि किस्से ऐकले आहेत. जंगलराज लोकांनी बिहारची काय अवस्था केली होती. याची त्यांना कल्पना नाही. पंजा आणि लालटेनच्या पकडीमुळे बिहार स्थलांतराचे प्रतीक बनले होते, असे प्रतिपादन सिवानच्या जसोली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.**



पंतप्रधान मोदी म्हणाले, बाबासाहेबांच्या फोटोसोबत राजदच्या लोकांनी काय केले? बिहारमध्ये पोस्टर लावण्यात आले आहेत. माफी मागा, पण हे लोक कधीही माफी मागणार नाहीत. त्यांना दलित आणि मागास लोकांबद्दल आदर नाही. राजद बाबा साहेबांना आपल्या पायात ठेवते. मोदी त्यांना आपल्या हृदयात ठेवतात. राजद-काँग्रेसच्या कृती बिहारविरोधी आहेत. त्या गुंतवणूकविरोधी आहेत. जेव्हा हे लोक विकासाबद्दल बोलतात तेव्हा लोकांना दुकाने आणि घरांना सर्वत्र कुलूप लटकलेले दिसतात. हे लोक बिहारमध्ये माफिया राजवट, गुंड, राजवट आणि भ्रष्टाचाराचे समर्थक राहिले आहेत.

मी तुमच्या लोकांमधून येत असताना, कालच पाऊस पडला, सकाळीही थोडा पाऊस पडला, तरीही तुम्ही सर्वजण इतक्या मोठ्या संख्येने आलात आणि आम्हाला आशीर्वाद दिलात, मी तुमचे कितीही मनापासून आभार मानले तरी ते कमीच असेल. मी कालच परदेशातून परतलो आहे. या भेटीदरम्यान मी जगातील मोठ्या आणि समृद्ध देशांच्या नेत्यांशी संवाद साधला. भारताच्या जलद प्रगतीने सर्व नेते खूप प्रभावित झाले आहेत.

ते भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनताना पाहत आहेत आणि बिहार निश्चितच खूप मोठी भूमिका बजावणार आहे. बिहारची भरभराट होईल आणि देशाच्या समृद्धीतही मोठी भूमिका बजावेल. मी बिहारच्या लोकांना खात्री देण्यासाठी आलो आहे की आम्ही खूप काही केले आहे, पण मोदी असे नाहीत जे इतके काही करूनही गप्प बसतील. आता मी पुरे केले आहे, नाही. मला बिहारसाठी अजून खूप काही करायचे आहे. मला तुमच्यासाठी हे करावे लागेल. मला इथल्या प्रत्येक गावासाठी ते करावे लागेल. मला इथल्या प्रत्येक घरासाठी ते करावे लागेल. मला इथल्या प्रत्येक तरुणासाठी ते करावे लागेल.

जर मी गेल्या दहा-अकरा वर्षांबद्दल बोललो तर या दहा वर्षांत बिहारमध्ये सुमारे ५५ हजार किमी ग्रामीण रस्ते बांधले गेले आहेत. १.५ कोटींहून अधिक घरांना वीज जोडण्यात आली आहे. १.५ कोटी घरांना पाण्याची जोडणी देण्यात आली आहे. ४५ हजारांहून अधिक कॉमन सर्व्हिस सेंटर बांधण्यात आली आहेत.

### आफ्रिकेत बिहारचे कौतुक होईल

पंजा आणि लालटेन यांनी मिळून बिहारच्या स्वाभिमानाला खूप दुखापत केली आहे. या लोकांनी इतकी लुटमार केली की गरिबी बिहारचे दुर्दैव बनली. अनेक आव्हानांवर मात करून, नितीशजींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने बिहारला पुन्हा विकासाच्या मार्गावर आणले आहे. आज पहिले इंजिन आफ्रिकेत निर्यात केले जात आहे. बिहारचे आफ्रिकेतही कौतुक केले जाणार आहे. त्याचा कारखाना मधुरा येथे आहे. हा कारखाना त्याच जिल्ह्यात बांधला गेला आहे, ज्याला आरजेडी आणि काँग्रेसने मागासलेले म्हणत सोडून दिले होते.

### पंतप्रधान मोदींनी वंदे भारतला हिरवा झेंडा दाखवला

सिवानहून पंतप्रधानांनी बिहारला नवीन वंदे भारतची भेट दिली आहे. ही ट्रेन पाटणा आणि गोरखपूर दरम्यान धावेल. ही ट्रेन आठवड्यातून ६ दिवस धावेल. ती पाटणा ते गोरखपूर हे मुझफ्फरपूर, मोतिहारी, बेतिया मार्गे ७ तासांत अंतर कापेल. यासोबतच, पंतप्रधानांनी वैशाली-देवरिया मार्गावर एका नवीन ट्रेनचे उद्घाटन केले.

# बाजारपेठेतील रखडलेली कामे पूर्ण करा

## शिवसेनेचे किरण काळे : महापालिका प्रशासनाला निवेदनाद्वारे इशारा



मनपा आयुक्तांनी शहराच्या मध्य बाजारपेठेतील सुरू असणाऱ्या सर्व प्रकारच्या कामांशी निगडित अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार यांना नियोजनबद्ध, तातडीने, जलद गतीने सर्व कामे पूर्ण करण्याबाबत सूचना कराव्यात, याबाबत आपण योग्य ती पावले न उचलल्यास तीव्र आंदोलन छेडणार आहे. चित्रा टॉकीज परिसरामध्ये रस्त्यावर साचलेला कचरा दोन दिवसांच्या आत उचलून परिसर स्वच्छ न केल्यास सदर ठिकाणी शहराची कचराकुंडी केल्याबद्दल मनपा प्रशासन, सत्ताधारी महायुतीचे आभार मानणारा जाहीर फलक लावून जाहीर निषेध करणार आहोत.

**-किरण काळे, शहर प्रमुख- ठाकरे शिवसेना**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : मध्य शहरास बाजारपेठ एकाच वेळेला चोहोबाजूंनी खांदून ठेवत ऐन पावसाळ्यात व्यापारी, सर्वसामान्य नगरकरांची पिळवणूक मनपा प्रशासन करत आहे. विकासाच्या नावाखाली नियोजन शून्य कारभार सुरू आहे. आंधळ दळतंय, कुत्र पीठ खातय, अशी शहराची अवस्था मनपा प्रशासन व सत्तेचा रिमोट कंट्रोल असणाऱ्या सत्ताधारी महायुतीने केला आहे. आता खूप झाले. नगरकरांसाठी हे सहन करण्या पलीकड गेले आहे.

मध्य शहर, बाजारपेठेतील रखडलेली काम नियोजनबद्ध रित्या जलद गतीने पूर्ण करा. अन्यथा मनपाला आंदोलन छेडण्याचा इशारा ठाकरे शिवसेनेतर्फे शहर प्रमुख किरण काळे यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

कचरा संकलन यंत्रणेचा बोजवारा उडाला असून मनपाने संपूर्ण शहराचीच कचराकुंडी करत नगरचा नरक केल्याचा हल्लाबोल यावेळी चित्रा टॉकीज परिसराची पाहणी करताना काळे यांनी केला.

यावेळी कामगार आघाडीचे नेते विलास उबाळे, गौरव ढोणे, आनंद राठोड, सुनील भोसले, महावीर मुथा, गणेश आपरे, किशोर कोतकर, विकास भिंगारदिवे, बबन आढाव, जयराम आखाडे, बाबासाहेब पान ४

# तुम्ही मालक नाही, सेवक आहात

## पालिका अधिकाऱ्यांना आ. हेमंत ओगले यांची तंबी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : सेवक आहात मालक नाही नागरीकांचे प्रश्न सोडवायचे नसेल तर घरी जा असा सज्जड दम आ. हेमंत ओगले यांनी दिला. श्रीरामपूर नगरपरिषदेच्या हद्दीतील प्रश्न संदर्भात आढावा बैठकीचे आयोजन केले होते.



यावेळी मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्यासह सर्व विभाग प्रमुख हजर होते. आ. ओगले म्हणाले की, नागरिकांनी उपस्थित केलेले प्रश्न विचारात घेता, असे लक्षात येते की, प्रशासकीय राजवट असल्यामुळे अधिकारी मनमानी पद्धतीने काम करत आहे.

या बाबतचा अनेक लेखी तक्रारी माझ्याकडे प्राप्त झालेल्या आहेत. त्यावर त्वरित कार्यवाही करा अन्यथा मला टोकाचे पाऊल उचलावे लागेल, अशी आक्रमक भूमिका आ. ओगले यांनी घेतली.

करण ससाणे म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन तक्रारी देखील अधिकारी सोडवू शकत नाही, शहरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून पाणीपुरवठाबाबत अनेक तक्रारी येत आहेत. परंतु, प्रशासनातल्या काही उदासीन अधिकाऱ्यांमुळे सर्वच प्रशासन बदनाम होताना दिसत आहे. त्यामुळे येणाऱ्या कालावधीत आपण आपल्या कामात सुधारणा करावी, अशी सर्वांची माफक अपेक्षा असल्याचे ससाणे यांनी म्हटले.

सचिन गुजर म्हणाले की, शहरामध्ये सगळ्यात पान ४

# कंटेनरने महिलेला चिरडले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : कोपरगाव शहरातील येवला रोड जवळ उमा वे ब्रिज समोर काल, शुक्रवारी, दुपारी १२ वाजेच्या सुमारास रामकृष्ण माधव महाले (वय ६२)तसेच त्यांची पत्नी संगीता रामकृष्ण महाले (वय ५६, रा. वेद कॉलनी येवला, ता. येवला, जि. नाशिक) हे एमएच १५ ईव्ही ३१६८ या टीव्हीएस ज्युपिटर या गाडीने साकुरी येथून दशक्रिया विधीचा कार्यक्रम आटपून येवल्याकडे परतत असतांना कोपरगाव येथे येवला रोडवरील उमा वे ब्रिज समोर त्यांच्या गाडीला मागून ट्रक (टि.एन.८८ जे ४१८३) ने जोराची धडक दिल्याने दोघे



पती-पत्नी गाडीवरून रस्त्यावर पडले. मात्र त्यात संगीता महाले या ट्रकच्या पुढील चाकासमोर पडल्याने व ट्रक चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने सदरचा ट्रक संगीता महाले यांच्या अंगावरून गेल्याने त्यात सदर महिलेचा मृत्यू झाला.

तसेच रामचंद्र महाले यांना हाताला व डोक्याला जबर मार लागला असून त्यांना औषध उपचारासाठी जिल्हा ग्रामीण रुग्णालयामध्ये नेण्यात आले. सदरचा ट्रक चालक पान ४

# माहेगाव देशमुखच्या दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

## मा. आ. अशोकराव काळेंसह आ. काळेंनी दिल्या वारकऱ्यांना शुभेच्छा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : मा. खा. स्व. कर्मवीर शंकरराव काळे व स्व. सुशीलामाई काळे यांच्या कृपा आशीर्वादाने मा. आ. अशोकराव काळे व आ. आशुतोष काळे यांच्या प्रेरणेतून मागील वर्षापासून श्री क्षेत्र माहेगाव देशमुख ते श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मागीलवर्षी प्रमाणे याहीवर्षी मोठ्या उत्साहात यादिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले.

वारी हीमहाराष्ट्राच्या संस्कृतीची शान असून वारकरी संप्रदाय ही आपल्या संस्कृतीची खरी ओळख आहे. संतांच्या विचारांनी आणि नामस्मरणाच्या शक्तीने समाजाला एकतेत गुंफण्याचे कार्य वारकरी करतात आणि संतांच्या शिकवणीमुळे समाजात एकता आणि प्रेम वृंद्धीगत होते. चांगला पाऊस पडून बळीराजाचे जीवन सुखी होवून सर्वांना सुख-समृद्धी लाभावी अशी श्री पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना.

**- अशोकराव काळे, माजी आमदार**

यावेळी मा. आ. अशोकराव काळे यांनी विधिवत श्री गुरुदत्त महाराजांचे परमभक्त असलेल्या गवळीराम बाबांच्या पालखीचेपूजन करून पंढरपूरकडे निघालेल्या वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. मागील वर्षापासून कोपरगाव तालुक्यातील माहेगाव देशमुख येथूनअमृतेश्वर भजनी मंडळ व ग्रामस्थांच्या सहकार्यातून श्री क्षेत्र माहेगाव देशमुख तेश्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळा सुरु करण्यात आला आहे. काल (दि. २०) रोजी श्री क्षेत्र माहेगाव देशमुख येथून



दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले. दिंडीच्या प्रस्थानावेळी मोठ्या संख्येने वारकरी सहभागी झाले होते. भगव्या झेंड्यांच्यालहरती रांगा, टाळ-मृदंगाचा निनाद, 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात सर्व परिसरभारावून गेला होता.

यावर्षी नेहमीपेक्षा लवकरच पावसाला सुरुवात झाली आहे. सर्वत्र मोठ्या प्रमाणात पान ४

# माध्यमिक विभागाच्या कारभाराचा पर्दाफाश

## चक्क नियम डावलून कामकाज; कार्यालयीन वेळेत कर्मचाऱ्यांच्या कॅटिंगममध्ये बैठका

**महेश रक्ताटे**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : 'आंधळं दळतयं अन् कुत्र पीठ खातयं' असाच कारभार सध्या जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाचा सुरु आहे. जिल्ह्यातील काही शाळांची कामे नियमबाह्य पध्दतीने केली जात असल्याची चर्चा सध्या जिल्ह्यातील शिक्षकांमध्ये सुरु आहे. याबाबत शिक्षणाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाला सोळा जूनपासून सुरवात झालेली आहे. नवीन विद्यार्थ्यांचे फूल देऊन चॉकलेटने तोंड गोड करून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे पालक व शिक्षकांमध्ये उत्साह मोठ्या प्रमाणात दिसून येत होता. पहिला दिवस आनंदात गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी जिल्ह्यातील अनेक चेहऱ्यांवर नाराजीची भावना दिसून आली.

माध्यमिक शिक्षण विभागातील पगार बिलासह मेडिकल बिल, वेतनश्रेणी आदी प्रकरणांच्या कामासाठी देवाण-घेवाण केली जात असल्याची चर्चा सध्या सुरु आहे. ही चर्चा शिक्षण विभागातील वरिष्ठ नेत्यांच्या कानावर काहींनी घालूनही त्यात फरक पडलेला आहे.

दरवर्षीच विविध कामांसाठी आर्थिक देवाण-घेवाण करावी लागत असल्याची चर्चा सध्या शिक्षकांमध्ये सुरु आहे. लिपीकच कोणतेही प्रकरण शिक्षण विभागात घेऊन जाण्याच्या अगोदर आकडा सांगत आहे. त्यामुळे आकड्याचा झोल नेमका कोठून होतो, याची चर्चा सध्या जिल्ह्यातील शिक्षकांमध्ये सुरु आहे.




शिक्षण विभागातील गोंधळ (भाग-१)

### जाण्या-येण्याचे पैसे घेतले जातात

शिक्षकांचे काही बिले मुख्यालयातून मंजूर करून आणायचे असतील तो जाण्या-येण्याचा खर्च काही लिपीक शिक्षकांकडून घेत असल्याची चर्चा सध्या जिल्ह्यात सुरु आहे. याकडे शिक्षण विभागाने लक्ष द्यावे, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे.

जिल्ह्यातील काही शाळांच्या लिपिकांच्या बाबतीत तक्रारी झालेल्या आहेत. मात्र त्यावर ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे शिक्षकांमध्ये शिक्षणच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली जात आहे...... (क्रमशः)

### चर्चेतील टेबल बदलण्याची मागणी

काही टेबलवरील कर्मचारी नियमबाह्य पध्दतीने कामकाज करीत आहे. याबाबत शिक्षकांच्या तक्रारी आहे. या तक्रारी वरिष्ठांपर्यंत होऊनही त्यांनी फक्त बघ्याची भूमिका घेतलेली आहे. ज्यांच्या तक्रारी आहेत. त्यांचे टेबल बदलण्यात यावे, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे.

**वाचा उद्याच्या भागात : विद्यार्थी आणले जातात खासगी वाहनाने**

# राहुरीचे बिडीओ श्रीरंग मुंडे लाच घेताना रंगेहाथ पकडले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : राहुरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुधाकर श्रीरंग मुंडे यांना दहा हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे.



राहुरी तालुक्यातील सेवानिवृत्त ग्रामसेकाने दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. गटविकास अधिकारी सुधाकर मुंडे यांच्या अहवालावरून अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर ग्रामसेवक यांच्यावर निलंबनाची कारवाई केली होती.

त्यानंतर तक्रारदार सेवानिवृत्ती झाली. त्यांच्यावरील दोषारोपात्राचा अहवाल गटविकास अधिकारी मुंडे यांना पाठवायचा होता. तो अहवाल तक्रारदार निलंबित ग्रामसेवक यांच्या बाजूने पाठविण्याकरता १० हजार रुपये लाचेची गटविकास अधिकारी सुधाकर गुंडे यांनी मागणी केली होती. हि लाच स्वीकारताना सुधाकर मुंडे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही काल करण्यात आली असून लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभागाच्या पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा घारगे यांच्या पथकाने केली. याबाबत राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धक्का लागल्याने तरुणाला ठोकळ्याने मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** हॉटेलमध्ये पाणी घेण्यासाठी गेलेल्या तरुणास धक्का लागल्याच्या कारणावरून तीन जणांनी बेदम मारहाण केली. तसेच लाकडी ठोकळ्याने केलेल्या मारहाणीत फीर्यादी हा गंभीर जखमी झाला आहे. ही घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली आहे.

याप्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला तीन आरोपींन विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी योग्य कलम लावुन तातडीने आरोपींना अटक करण्याची मागणी जखमीच्या नातेवाईकांनी निवेदनद्वारे केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नान्नज येथे दि. १७ जुन २०२५



रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास विक्रम बबन कोळी हा एका हॉटेलमध्ये त्याचा भाऊ येणार असल्याने थांबला होता. यावेळी फिर्यादी हा हॉटेलमध्ये पाणी घेण्यासाठी गेला होता. यावेळी तीथे बसलेला आरोपी सोमनाथ भरत मोहळकर याच्या पायाची लाथ फिर्यादी विक्रम कोळी यास लागली. त्यावेळी कोळी याने त्यास विचारणा केली असता तो शिवीगाळ करुन म्हणाला की, तु लई माजला का तुला दाखवतो. त्यानंतर कोळी हा हॉटिल समोर आला असता तेथे दुसरे आरोपी असिम जब्बार शेख व छोट्या हरुन शेख हे कोळी जवळ आले व शिवीगाळ करु लागले व तु सोमनाथ मोहळकर सोबत वाद का घालतो, असे म्हणुन लाथाबूक्याने मारहाण करण्यास केली. विक्रम बबन कोळी (रा. पोतेवाडी, ता. जामखेड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी सोमनाथ भरत मोहळकर, असिफ जब्बर शेख व छोट्या हरुन शेख (सर्व रा. नान्नज ता. जामखेड) यांच्यावर जामखेड पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एस. डी. लोखंडे हे करीत आहेत.

# अमृतवाहिनी निडोचे विद्यार्थी इस्त्रोला भेट देणार

## प्राचार्य अंजली कन्नावार यांची माहिती; माजी मंत्री थोरातांसह सुधीर तांबेंकडून शुभेच्छा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूलच्या सात विद्यार्थ्यांची डॉ. सी. व्ही. रमण बाल वैज्ञानिक परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवून चमचमणारे तारे म्हणून निवड झाली आहे. सात विद्यार्थ्यांना इस्त्रोमधील विशेष वैज्ञानिक कार्यशाळेत स्थान मिळवून त्यांनी इस्त्रोच्या दौऱ्यावर जाण्याची सुवर्णसंधी या बालवयात मिळाली असल्याची माहिती प्राचार्य अंजली



कन्नावार यांनी दिली आहे.

इस्त्रोमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबत माहिती देताना प्राचार्य म्हणाल्या की, रुद्र बोऱ्हाडे (इयत्ता ६ वी), स्वरा अडांगळे (इयत्ता ७ वी), सावित्री वाकचौरे (इयत्ता ७ वी), मनीष कोहकडे (इयत्ता ७ वी), अर्चित पवार (इयत्ता ७ वी), वरद पाचोरे (इयत्ता ८ वी), पृथ्वीराज नेहे (इयत्ता ९ वी) या सर्व विद्यार्थ्यांची चमकणारे तारे म्हणून निवड झाली आहे. अमृतवाहिनीचे निडो इंटरनॅशनल स्कूल गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी नेहमीच कार्यरत असते. सातत्यपूर्ण शिक्षणाच्या आधारे सातही विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी व परिश्रमाच्या आधारे बालवायत इस्त्रोला भेट देण्याची संधी मिळविली आहे.

### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

सर्व विद्यार्थ्यांचे माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, अमृतवाहिनी संस्थेच्या विश्वस्त शरयू देशमुख, निडो स्कूलच्या संचलिका अंजली कन्नावार यांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कौतुक करून इस्त्रोच्या भेटीसाठी अभिनंदन केले आहे.

# 'शंकरस्वामी' देवस्थानच्या दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** तालुक्यातील श्री क्षेत्र शिऊर येथील शंकर स्वामी महाराज संस्थानच्या वतीने टाळ-मृदंगाचा गजर आणि विठू नामाचा जयघोष करत पंढरपूर आषाढी वारीसाठी पायी दिंडी सोहळ्याचे बुधवार रोजी चार वाजता भक्तिमय वातावरणात पंढरपूरकडे प्रस्थान झाले.

तुकाराम महाराज यांचे शिष्य निळोबाराय आणि निळोबारायाचे शिष्य शंकर स्वामी आहे. त्यामुळे शंकर स्वामी आज यांच्या दिंडीला पंढरपूरला विशेष मान असतो. त्यावेळी संस्थानाचे अध्यक्ष एकनाथ जाधव, उपाध्यक्ष हभप सारंगधर महाराज भोपळे, संस्थानचे सर्व विश्वस्त, दिंडी सोहळ्याचे अध्यक्षांसह सर्व





पदाधिकारी, वैजापूर तालुक्यातील राजकीय व धार्मिक क्षेत्रातील पदाधिकारी, परिसरातून आलेले महाराज, वारकरी, भाविक भक्तांची उपस्थिती होती. पहिला रात्रीचा मुक्काम रघुनाथपुरवाडी येथे केला व आज लासुरगाव येथे आहेत व उद्यापासून रात्रीचा मुक्काम तांदूळवाडी, प्रवरा संगम,उस्थळ, घोडेगाव, धनगरवाडी, अहिल्यानगर, रुईछत्तीसी, कोकणगाव, डाकू, निमगाव, करमाळा, वरकटणे, सातोली, अजगर वस्ती, होळे असे करत दि. ४ जुलैला श्रीक्षेत्र पंढरपूरमध्ये पोहोचणार आहे. त्यानंतर दि. १० जुलैला पालखी रथ पंढरपुरात राहिल. काल्याचा प्रसाद घेऊन परतीचा प्रवास होणार आहेत.

# पर्यावरण समितीच्या सदस्यपदी जगतापांची वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** राजगुरूनगर येथे हिरवाई



पर्यावरण समितीच्या राज्यस्तरीय वार्षिक बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनंतर सर्वानुमते राज्यस्तरीय पर्यावरण समितीच्या सदस्यपदी श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर येथील धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरण प्रेमी आण्णासाहेब जगताप यांची निवड करण्यात आली. राजगुरूनगर येथे झालेल्या बैठकीत पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी हिरवाई पर्यावरण समिती आणि पर्यावरण समितीचे अध्यक्ष विजयकुमार जेठे यांच्या अध्यक्षतेखाली आणि जेष्ठ मार्गदर्शक पांडुरंग चौघुले यांच्या उपस्थितीत विविध उपक्रम हाती घेण्याबाबत सर्वानुमते चर्चा करण्यात आली.

# श्री वृद्धेश्वर कारखान्यात मिल रोलरचे पूजन

## चेअरमन राजळे यांच्या हस्ते विधिवत पुजा; सहा लाख टन गाळपाचे उद्दिष्ट



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२०२६ या गळीत हंगामासाठी पहिल्या मिल रोलरचे विधीवत पूजन कारखान्याचे चेअरमन आप्पासाहेब राजळे यांच्या शुभहस्ते गुरुवारी करण्यात आले. कारखान्याने यंदाच्या हंगामासाठी सहा लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट निश्चित केले असून त्यानुसार सर्व पूर्वतयारींना वेग आला आहे.

श्री वृद्धेश्वर कारखान्याच्या यशस्वी वाटचालीसाठी चेअरमन आप्पासाहेब राजळे, आ. मोनिका राजळे आणि संचालक मंडळाचे सतत मार्गदर्शन लाभत असून व्यवस्थापनाच्या नियोजनशीर कामकाजामुळे कारखाना दरवर्षी प्रगती करत आहे.

या पूजन कार्यक्रमास कारखान्याचे व्हा. चेअरमन रामकिसन काकडे, संचालक उध्दवराव वाघ, राहुल राजळे, सुभाष ताठे, सुभाष बुधवंत, कुशीनाथ बर्डे, कोडीराम नरोटे, श्रीकांत मिसाळ, शेषराव ढाकणे, यशवंत गवळी, काकासाहेब शिंदे, बाळासाहेब गोल्हार, बाबासाहेब किलबिले, अनिल फलके, नारायण काकडे, शरद अकोलकर, साहेबराव सातपुते यांच्यासह कारखान्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मशिनरी दुरुस्ती व देखभालीचे काम सुरू

हंगाम वेळेवर व सुरळीत सुरू होण्यासाठी कारखान्याच्या वतीने ऊसतोडणी व वाहतूक यंत्रणांची भरती तसेच मशिनरी दुरुस्ती व देखभाल यांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यासाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात आला असून त्या अनुषंगाने अधिकारी, कर्मचारी व कामगार तळमळीने कार्यरत आहेत.

# जिवे मारण्याची धमकी देणाऱ्यावर कारवाई करा

## मनसेच्या पदाधिकाऱ्यांचे जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील अमन शिवकुमार श्रीमल यांनी पोलीस कर्मचारी अभिजित अरकल हा वारंवार जिवे मारण्याची धमकी देत असून अमन शिवकुमार श्रीमल यांनी आपल्याकडे वरील पोलीस कर्मचारी यांच्या विरोधात तक्रार केली होती. त्यावर आपण कायदेशीर कारवाई करुन त्याची पोलीस खात्यांतर्गत चौकशी चालु केली आहे.



याचा त्याला राग आल्यामुळे तो अमन शिवकुमार श्रीमल यांना वारंवार भेटून तू केलेली माझ्या विरोधात तक्रार मागे घे अन्यथा तूला व तूझ्या १७-१८ महिन्याचे मुलगी जिवे मारुन टाकेल किंवा तूला खोट्या केसमध्ये अडकवून जामिन सूद्धा होऊ देणार नाही, असे म्हणत धमकी देतो.

कर्मचारी अभिनित अरकल या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मनसेच्या वतीने गजेंद्र राशिनकर यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांना निवेदनद्वारे केली.

यावेळी महिला जिल्हाध्यक्षा अनिता दिघे, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, किरण रोकडे, संकेत व्यवहारे, प्रशांत जाधव, प्रकाश गायकवाड़ आदी उपस्थित होते.

# कुकाणा ते पंढरपूर पायी दिंडीचे सोमवारी प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा :** नेवासा तालुक्यातील श्रीक्षेत्र कुकाणा व तरवडी येथील श्री हरी आषाढी वारी कुकाणा ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान सोमवार दि. २३ जुन रोजी होणार असल्याची माहिती दिंडी व्यवस्थापकांनी दिली आहे.

या पायी दिंडी सोहळ्याचे तेरावे वर्ष असून अतिशय शिस्तबद्ध नियोजन केले जाते. श्रीक्षेत्र देवगड संस्थानचे गुरुवर्य भास्करगिरी महाराज व रामनाथ महाराज राजगुरु काळेगावकर यांच्या प्रेरणेने



आणि रामयनाचार्य बबन महाराज पाटेकर व सुरेश महाराज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली कुकाणा, तरवडी ग्रामस्थ व भजनी मंडळाच्या सहकार्याने या दिंडी सोहळ्याचे आयोजन केले आहे. या दिंडी सोहळ्याचे प्रस्थान दि. २३ जुन रोजी सकाळी ८ वाजता कुकाणा येथील विठ्ठल मंदिर येथून आ. विठ्ठलराव लंघे पाटील यांचे हस्ते होणार आहे तर दिंडी प्रस्थान पुजा माजी आमदार तथा ज्ञानेश्वर कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग अभंग, ज्येष्ठ संचालक ॲड. देसाई देशमुख, भैय्यासाहेब देशमुख, माजी सरपंच एकनाथराव कावरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

### मान्यवरांच्या हस्ते होणार पादुकांचे पूजन

विना पुजन माजी उपसरपंच बाळासाहेब कचरे, मच्छिंद्र जाधव, अशोक चौधरी, राष्ट्रवादीचे युवा नेते अब्दुलभाई शेख, प्रा. रज्ञाक इनामदार, अशोकराव मंडलिक, जवाहर भंडारी यांचे हस्ते होईल. तर कुकाण्याच्या सरपंच लताताई अभंग, उपसरपंच शुभांगी कचरे, तरवडी गावच्या सरपंच स्वप्नाली क्षिरसागर उपसरपंच रेखा घुले यांच्या हस्ते रथ व पादुकांचे पुजन करून या दिंडी सोहळ्या प्रस्थान होणार आहे.

# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली.

बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी हेमलता बडे, उपजिल्हाधिकारी गौरी सावंत,अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त सो.ह इंगळे, वैधमापनशास्त्र विभागाचे उप नियंत्रक रमेश दराडे उपस्थित होते. हिंगे म्हणाले, ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक समन्वयातून व्हावी. पावसामुळे रस्त्यावर उन्मळून पडलेली झाले, विद्यूत पोल आदी तातडीने हटविण्यात यावीत.

नागरिकांना विद्युत विषयक असलेल्या समस्यांची तक्रार करण्यासाठी २४७ हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित राहील, याची दक्षता घ्यावी. विद्यूत विषयक दुरुस्तीचे कामे प्राधान्याने करण्यात यावीत. नागरिकांना जारच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येणार्या पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासणीबरोबरच फळे पिकवण्यासाठी रसायन वापराच्या तक्रारीच्या अनुषंगाने फळे विक्रेत्यांची तपासणी करुन दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या. सेतु सुविधा केंद्रातून नागरिकांना दिल्या जाणार्या सेवा योग्य आहेत काय, त्यासाठी आकारला जाणारे फिस, दिली जाणारी सेवा याच्या तपासणीसाठी लवकरच अभिप्राय कक्ष कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. बैठकीत नगर शहरात गुटख्याची विक्री करणार्या विक्रेत्यांवर कारवाई, प्रत्येक सेतू सुविधा केंद्राच्या दर्शनी भागात दरसूची लावणे, आरोग्यासाठी हानीकारक असलेले प्लास्टिक कप, ग्लासचा वापरावर निर्बंध व जागृती करणे, भेसळयुक्त पनीर विक्री करणार्यांवर कारवाई, ऊर्जामित्र बैठकीचे आयोजन, पेट्रोल पंपावर नागरिकांना आवश्यक त्या सुविधा पुरविणे, शासकीय दवाखान्यातून मोफत औषध पुरवठा आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीस विविध विषयांवरील चर्चेत अशासकीय सदस्य अतुल कुर्हाडे, विलास जगदाळे, दिनेश थोरात, अशोक शेवाळे, रणजित श्रीगोड, उमा मेहेत्रे, गजेंद्र क्षीरसागर, बाबासाहेब भालेराव, डॉ. कळमकर राजेंद्र पर्वती, प्रा. डॉ. मंगला भोसले, डॉ. अशोक गायकवाड, डॉ. विलास सोनवणे, डॉ. गोरख बारहाते, प्रकाश रासकर, रभाजी सुळ यांनी सहभाग घेतला.

# राजेंद्र देसाई वृक्षभूषण पुरस्काराने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील पत्रकार राजेंद्र देसाई यांना स्वराज सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने वृक्षभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी आदर्श सरपंच भास्करराव पेरे यांनी उपस्थित लोकनियुक्त सरपंच पोलीस पाटील ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना संबोधित करत आदर्श गावाची





व्याख्या तसेच वृक्षारोपण काळाची गरज, जल है तो कल है या उक्तीप्रमाणे सामाजिक शैक्षणिक अध्यात्मिक क्षेत्राबद्दल माहिती दिली.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय कीर्तनकार जयश्री तिकांडे, ऑननरी कॅप्टन प्रकाश त्रिभुवन, यादवराव पावशे, अमोल शेवाळे, रोहित पवार, बाबासाहेब पावशे आदी प्रयत्नशील होते.

देसाई यांनी पत्रकारिता तसेच गृह रक्षक दलाच्या माध्यमातून सामाजिक 'अध्यात्मिक' क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी तसेच वृक्ष संवर्धन वृक्ष लागवड, वृद्ध निराधार यांना मदत कार्य केले, असे अनेक विविध उपक्रम राबविले याबद्दल वृक्ष भूषण पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते देसाई यांना सन्मानित करण्यात आले.

# सार्वजनिक ग्रंथालयात योगदिनाचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दि. २१ जून रोजी जिल्ह्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात येणार असून २० ते २७ जून या कालावधीत योग आणि आरोग्य शास्त्र विषयक ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी रा.दा. शिंदे यांनी दिली आहे. दि. २० जून रोजी दुपारी १ वाजता जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथे उद्योजक, वक्ता व लेख एन.बी. धुमाळ यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उदघाटन करण्यात येणार आहे. शासकीय सुट्टया वगळता हे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नागरिकांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. या ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ नागरिक, शालेय विद्यार्थी, विद्यार्थीनी यांच्यासह वाचक सभासदांनी घ्यावा, असेही कळविण्यात आले आहे.

# विखे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

## प्राचार्य डॉ. राठी यांची माहिती; पालकमंत्री विखेंसह दिग्गजांकडून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील पॉलिटेक्निकच्या १७ विद्यार्थ्यांना पाटस येथील विटगन इंडीया प्रा. लि. या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये नोकरीची संधी उपलब्ध झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. विजय राठी यांनी दिली.

स्थापत्य अभियांत्रीकीमध्ये अग्रगण्य असलेल्या विटगन इंडीया प्रा. लि. या कंपनीमध्ये इमारत ऊभारणीसाठीचे विविध तंत्र आणि सेवा उपलब्ध आहेत. याचा विद्यार्थ्यांना मोठा फायदा होत आहे. या कंपनीचे मनुष्यबळ व्यवस्थापक रूषिकेश गायकवाड, सुजित झा यांनी विद्यार्थ्यांच्या कॅम्पस मुलाखती घेतल्या. यासाठी मनुष्यबळ विकास विभागाचे प्रमुख सुहास ईनामदार यांची सहकार्य लाभले.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे





पाटील यांचे मार्गदर्शनाखाली संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून विविध कंपन्यांबरोबर शैक्षणिक कराराच्या माध्यमातून शेवटच्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळण्यासाठी मोठी मदत होत असल्याचे प्राचार्य डॉ. विजय राठी यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होणेसाठी ट्रेनिंग प्लेसमेंटचे समन्वयक प्रा. मनोज परजणे, ट्रेनिंग प्लेसमेंट अधिकारी प्रा. राजेंद्र निंबाळकर, सर्व विभाग प्रमुख तसेच सर्व विभागातील ट्रेनिंग समन्वयक यांनी परिश्रम घेतले.

### दिग्गजांकडून विद्यार्थ्यांवर कौतुकांचा वर्षाव

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, प्राचार्य डॉ. विजय राठी यांनी अभिनंदन केले.

आवाज जागरूक जनतेचा
जनता आवाज
अहिल्यानगर, शनिवार, दि. २१ जून २०२५

# संतांनी आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखविला

## वि. दा. पिंगळे यांचे प्रतिपादन; नामदेवराव परजणे (आण्णा) यांचा पुण्यस्मरण सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** जातीयता, अस्पृष्यता आणि धार्मिक वांशिकतेवर प्रहार करुन मानवतावादी दृष्टीकोन मांडताना संतांनी समाजाला नैतिकता, मानवता आणि आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखविला. परमार्थ, नीती, सदाचार, सुसंस्कार या गोष्टी समाजमनावर रुजविण्यासाठी संत परंपरेचे अलौकीक योगदान समाजाला लाभलेले असल्याचे उद्गार पुणे येथील ज्येष्ठ साहित्यिक व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह वि. दा. पिंगळे सर यांनी संवत्सर येथील कार्यक्रमात काढले.

गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे संस्थापक दिवंगत नेते नामदेवराव परजणे पाटील (आण्णा) यांच्या २१ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त संवत्सर येथे आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानातून 'संत परंपरा व सामाजिक प्रबोधन' या विषयावर श्री. पिंगळे सर बोलत होते. पुणे येथील शिक्षणतज्ज्ञ अनिलराव गुंजाळ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी स्व. नामदेवराव परजणे आण्णा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तर गोदावरी खोरे सहकारी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे पाटील यांनी स्वागत व प्रास्तविक केले.

संतांनी आपल्या आचरणातून मानवी मूल्यांचा केलेला विचार आदर्शवत आहे. या आदर्शामुळेच महाराष्ट्राच्या लोकजीवनावर उत्तम संस्कार झालेले आहेत. संतांनी मानवतेची गुढी उभारताना माणुसकीला प्रतिष्ठा मिळवून दिली. अनासक्त माणसे लोकोध्दाराचे केवढे प्रचंड कार्य करु शकतात याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे आपल्या महाराष्ट्रातली संत परंपरा असल्याचे सांगून पिंगळे पुढे म्हणाले, संतांनी केवळ संत साहित्याचीच निर्मिती केली नाही तर, सामाजिक प्रबोधनातून भक्ती, श्रध्दा, अंधश्रध्दा,



लोकसंस्कृती, लोकदैवत, लोककथा, लोकगीत व अभंगांमधून समाज मनाला हात घातला. वैदीक मार्ग झाडून व तो स्वच्छ करून आपल्या लोकांना कळेल अशा भाषेत सिध्दांत देखील मांडला. या सिध्दांतामुळेच कोणत्याही जाती धर्माच्या माणसाला भक्तीपंथाच्याद्वारा आध्यात्मिक उन्नती साधण्यास, नैतिक सामर्थ्य वाढविण्यास व प्रापंचिक दुःखावर मात करण्यास मदत झाली. संवत्सर येथील नामदेवराव परजणे पाटील महाविद्यालय तसेच कोपरगांव महिला महाविद्यालयातील गरीब, गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना सुमारे २ लाख ५५ हजार रुपये शिष्यवृत्ती धनादेशाचे वाटप करण्यात आले. उपसरपंच विवेक परजणे यांनी आभार व्यक्त केले.

> शिक्षणतज्ज्ञ अनिलराव गुंजाळ यांनी आपल्या भाषणातून स्व. नामदेवराव परजणे आण्णा यांना आदरांजली वाहताना अशी माणसे शतकातून जन्माला येतात. जो निःस्वार्थपणे आणि मातृत्वाच्या कळवळ्याने सामाजिक सेवा करतो. त्याच्याकडे समाज देव म्हणून बघतो. आण्णांच्या कार्यातून आणि जगण्यातून देवत्वाची प्रचिती येते. माणसाला जगण्यासाठी जी मूल्ये लागतात ती आयुष्यभर जपली तर जगण्याचे सार्थक होते. माणसाने एकमेकांचे झाल्याशिवाय सामाजिक प्रगती होत नाही हे आण्णांनी ओळखले होते. आजच्या पिढीने अशा आदर्शवत माणसांच्या मौलिक विचारांची पेरणी केली पाहिजे.

# संघटन बळकटीसाठी गावांशी संवाद साधावा

## आ. चव्हाण; वैजापूर तालुक्यातील कार्यकर्त्यांशी संवाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विचारांशी नित्य जोडलेला जिल्हा आहे. आता जिल्हाध्यक्ष म्हणून या पक्षाच्या संघटन बांधणीला अधिक बळकटी देणार असून, प्रत्येक गाव पातळीवर लोकहितासाठी पक्षाची विचारधारा पोहोचवणार आहोत, असे प्रतिपादन नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आ. सतीश चव्हाण यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर, आ. सतीश चव्हाण यांनी काल गंगापूर व वैजापूर तालुक्यांमध्ये दौरा करत कार्यकर्त्यांशी संवाद साधला. गंगापूर येथील पक्ष कार्यालयात बोलताना त्यांनी नुकत्याच पार पडलेल्या पक्षाच्या २६ व्या वर्धापन दिनाची आठवण करून दिली. यावेळी माजी नगराध्यक्ष संजय जाधव, दिलीप बनकर, सोपान देशमुख, ज्ञानेश्वर सिदलंबे, नवनाथ वैद्य, नदीम शेख, नंदू सोनवणे, समीर सय्यद, रमेश निचीत, कल्याण पदार, शाहीद पटेल, राजू पठाण, सुधीर माने आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### ठिकठिकाणी केले स्वागत

भेटीदरम्यान वाळूज, लिंबेजळगाव, टेंभापुरी फाटा, ढोरेगाव, भेंडाळा फाटा, गंगापूर शहर, महालगाव व वैजापूर शहर अशा ठिकाणी आ. चव्हाण यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. ठिकठिकाणी फटाक्यांची आतिषबाजी आणि जल्लोषमय वातावरण पाहायला मिळाले.

# रांधे ओढा पुल देतोय अपघातांना निमंत्रण

## दगड व कचऱ्यामुळे नळ्या तुंबल्याने पाणी पुलावरून वाहते पाणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** रांधे - दरोडीला जोडणारा महत्त्वाचा, पण अरुंद पुलाच्या पाणी वाहणाऱ्या नळ्यांमध्ये पुराच्या पाण्याने वाहिलेले दगड व कचऱ्यामुळे नळ्या तुंबल्या. त्यामुळे वाहते पाणी पुलाखालून जाण्याऐवजी पुलावरून सातत्याने वाहू लागल्याने मोठ्या प्रमाणावर शेवाळ तयार झाले आहे. पाण्यातील या शेवाळावरून पायी, सायकल, दुचाकी, चारचाकीने प्रवास करणारे घसरून पडण्याचा धोका निर्माण झाला असून हा पुल त्वरीत दुरुस्त करावा किंवा येथे नवीन मोठा व रुंद पुल करण्याची मागणी रांधेचे सरपंच संतोषराव काटे यांनी केली आहे.



> या पुलाच्या कामासंदर्भात ग्रामपंचायतीच्या वतीने खा. निलेश लंके, आ. काशिनाथ दाते, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विश्वनाथ कोरडे व इतर राजकिय नेत्यांना समक्ष भेटून परिस्थिती चे गांभिर्य काटे यांनी पटवून दिले. त्यांनीही पुलाच्या दुरूस्तीबाबतचे आश्वासन दिले आहे.

पावसाळ्यातील जून महिन्यापासून या ओढ्याला मोठ्या प्रमाणावर पाणी असल्याने रांधे, दरोडी व पठार भागाला जोडणारा हा महत्त्व पूर्ण पुल असून या मार्गाने खाजगी वाहनांबरोबरच एसटी बस, शाळकरी विद्यार्थी, शेतकरी मोठ्या प्रमाणावर वाहतूक करत असतात.

सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्घटनेची वाट न पाहता एकतर हा छोटा पुल दुरुस्त करावा, अन्यथा १० फुट उंचीचा नवीन पुलाची उभारणी करावी, अशी मागणी करून सरपंच संतोषराव काटे यांनी केली आहे.

# मराठी शाळा हे ग्रामीण भागाचे वैभव

## अनिल पावडे; दरोडी शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुक्यातील दरोडी गावातील श्री हनुमान महाविद्यालय व प्राथमिक शाळा, दरोडी या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले.

शासनाच्या निर्णयानुसार इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना ज्याप्रमाणे पाठ्यपुस्तके मोफत देण्यात येतात. त्याचप्रमाणे दरोडी गावातील सरपंच अनिल पावडे यांच्या संकल्पनेतून तसेच सामाजिक कार्यकर्ते कैलास पावडे, डॉ. प्रवीण भोसले, उद्योजक बापूशेठ कड, मुख्याध्यापक सुरेश कड, युवा कार्यकर्ते अतुल कड, सरपंच अनिल पावडे व समस्त ग्रामस्थ दरोडी यांच्या विशेष सहकार्याने इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आल्या.



सामाजिक बांधिलकी जपत गावातील महाविद्यालय तसेच प्राथमिक शाळेतील २०० विद्यार्थ्यांना अंदाजे ३० हजार रुपये किंमतीच्या वह्या वाटप केल्या. यावेळी दरोडी गावच्या विद्यमान सरपंच जयश्री चौगुले, खरेदी विक्री संघाचे संचालक संग्राम पावडे, तंटामुक्तीचे अध्यक्ष बाळासाहेब चौगुले शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कुंदन भोसले, सामाजिक कार्यकर्ते दादाभाऊ कड, दिनेश चौगुले, संभाजी पावडे, मोहम्मद मुजावर, ग्रामसेवक जऱ्हाड भाऊसाहेब, जयराम दळवी दीपक गागरे याची प्रमुख उपस्थिती लाभली.

# नीट परीक्षेत आत्मा मालिकचे यश

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोपरगाव :** वैद्यकिय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या वतीने दिनांक ०४ मे २०२५ रोजी नीटची परीक्षा घेण्यात आलेली होती. सदर परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झालेला असून या परीक्षेत आत्मा मालिक ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थीनी खैरनार प्रांजली प्रकाश ७२० पैकी ५५७ गुण मिळवून कॉलेजमध्ये प्रथम येण्याचा मान पटकाविला.

जाधव आदित्य प्रशांत ५५३, गोरे पार्थ सोमनाथ ५३३, ढेकळे नक्षत्र ५१९, कु. जैन तनिषा ५१५, चौधरी पियुष ४६०, मंचरे रोहन ४४९, आमले समृद्धी ४४५ या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.


यावेळी विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी म्हटले की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून नीट व जेईई या परीक्षांची तयारी आकाश कोचिंग इंन्स्टियूट च्या माध्यमातून करुन घेतली जाते. विद्यार्थ्यांना कॉलेज, क्लासेस, निवास व भोजनव्यवस्था एकाच छताखाली मिळत असल्याने विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास वेळ मिळतो. आतापर्यंत एमबीबीएससाठी ३५, बीडीएससाठी २३ तर पशुवैद्यकियसाठी १५ विद्यार्थ्यांची शासकीय महाविद्यालयामध्ये निवड झालेली आहे.

# श्री शनैश्वर देवस्थानच्या दिंडीचे मंगळवारी प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर ते श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पायी दिंडी सोहळ्यासाठी श्री शनैश्वर देवस्थानचे महंत उदासी महाराज दिंडी मंगळवार दिनांक २४ जून रोजी सकाळी ८: ३० वाजता या मंत्री शंकरराव गडाख यांचे उपस्थितीत निघणार असल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले.

या दिंडीचे ३३ वे वर्ष असून हभप विश्वासमामा गडाख, बाबासाहेब महाराज घायाळ, कारभारी महाराज पंडित, अंबादास महाराज फलके, विठ्ठल शिकारे यांचे मार्गदर्शनाखाली निघणार असून दिंडीत दैनंदिन पहाटे काकडा, रस्त्याने चालताना हरी भजन, संध्याकाळी हरिपाठ व रात्री कीर्तन होणार आहे.



या दिंडीचा मंगळवार दिनांक २४ जून रोजी इमामपूरघाट पांढरीपूल, बुधवार दिनांक २५ जून रोजी चेतना सांस्कृतिक भवन अहमदनगर, गुरुवार दिनांक २६ जूनला रूईछत्तीस हायस्कूल तालुका नगर, शुक्रवार दिनांक २७ जूनला कोकणगाव तालुका कर्जत, शनिवार दिनांक २८ जूनला डाकू निमगाव तालुका कर्जत, रविवार दिनांक २९ जूनला देवळाली तालुका करमाळा, सोमवार दिनांक ३० जूनला आदिनाथ सहकारी साखर कारखाना जेऊर तालुका करमाळा, मंगळवार दिनांक १ जूलैला टेंभुर्णी तालुका माढा, बुधवार दिनांक २ जूलैला करकंब मराठी शाळा तालुका पंढरपू गुरुवार दिनांक ३, ४, ५, ६ जूलैला शनीमठ पंढरपूर येथे मुक्काम होणार असून सोमवार दिनांक ७ जुलै रोजी सकाळी ९ ते ११ कीर्तन होऊन महाप्रसाद होणार आहे मोठ्या संख्येने नाव नोंदणी करण्याचे आवाहन दिंडी संयोजकाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# ढोकेश्वर कॉलेजमध्ये नव्याने कोर्स सुरु

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुक्याच्या उत्तर भागाची महत्वाची बाजार पेठ असणाऱ्या व नगर कल्याण महामार्गावरील टाकळी ढोकेश्वर येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी एम. कॉम., एम. एस्सी, एम. एस्सी., बी. एस्सी., बी. सी. ए. असे नवीन कोर्स सुरु झाले असून सर्व सुविधा उपलब्ध असून, त्यासाठी महाविद्यालयात प्रवेश सुरु झाले आहेत. अशी माहीती महाविद्यलयाचे प्राचार्य लक्ष्मणराव मतकर यांनी दिली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सुविधा संस्थेने उपलब्ध करून दिली असुन प्रवेश मर्यादित आहेत. ग्रामीण भागातील मुला मुलींसाठी अत्यंत सुरक्षीत आणि निसर्गरम्य वातावरणातील हे महाविद्यालय आहे.तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी त्वरित आपला प्रवेश निश्चित करावा, असे अवाहन केले आहे.

# झेंडीगेट परिसरात महानगरपालिकेची अतिक्रमणांवर कारवाई

## ओपन स्पेस मधील टपऱ्या पत्राचे शेड कारवाई करून हटवले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** झेंडीगेट परिसरात असलेल्या दक्षिणमुखी हनुमान मंदिर समोरील, तसेच गैबी पीर ओपन पेसमध्ये असलेल्या अतिक्रमणांवर महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात आली. अनधिकृत पत्रा शेड, तसेच १० ते ११ टपऱ्या व भंगारचे पत्रा शेड महानगरपालिकेने कारवाई करून हटवले. गेल्या काही महिन्यांपासून शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू आहे. यात आता महानगरपालिकेच्या ओपन स्पेसवरील अतिक्रमणांवर कारवाई सुरू करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.



महानगरपालिकेच्या झेंडीगेट प्रभाग समिती कार्यालयाच्या क्षेत्रात ही कारवाई सुरू करण्यात आली. अतिक्रमण निर्मूलन विभागाचे उपअभियंता सुरेश इथापे, प्रभाग अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी रिजवान शेख, अर्जुन जाधव यांच्या पथकाने कोतवाली पोलिसांच्या बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमणांवर कारवाई केली. हनुमान मंदिरासमोर व गैबी पीर ओपन स्पेसवर पत्र्याचे शेड व टपऱ्या टाकून अतिक्रमणे करण्यात आली होती. महानगरपालिकेने ही अतिक्रमणे जमीनदोस्त केली.

# कोकमठाण ग्रामपंचायतच्या शिपायाची ग्रामस्थांना आरेरावी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर :** कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण ग्राम पंचायतमधील शिपाई ग्रामस्थांना आरेरावी करीत कामासाठी पैशांची मागणी करीत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

सध्या शाळा कॉलेज उघडल्याने पालकांची तसेच शेतकऱ्यांची ग्रामपंचायतमध्ये वर्दळ वाढली आहे. या शिपाईकडे ग्रामसेवकांबाबत चौकशी केली असता उडवा-उडवीची उत्तरे मिळतात. तसेच आरेरावीची भाषा केली जाते. संबंधित ग्रामपंचायतचे ग्रामसेवक हे सध्या ब्राह्मणगाव येथे कार्यरत असून त्यांच्याकडे सध्या कोकमठाण गावचा पदभार देण्यात आला असल्यामुळे ते दिलेल्या दिवशी फक्त ग्रामपंचायत मध्ये येऊन ते आपली कामे करतात. याचाच फायदा हा शिपाई घेत आहे.

याबाबत ग्रामसेवकांकडून माहिती घेतली असता ते म्हणाले की, सदर व्यक्तीस आम्हीच कंटाळलो आहे मागील सहा महिन्यापासून तो फक्त पंधरा ते वीस दिवसच हजर आहे. त्याचा मागील महिन्याचा पगार ३०० रुपये निघाला असून या महिन्यामध्ये संपूर्ण २० दिवस तो गैरहजर दाखवण्यात आला आहे.

# पाथर्डीत मावा विक्रीवर कारवाईची धास्ती

## तीन दिवसांपासून पानटपऱ्या बंद; पोलिस पथकाची धास्ती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** राज्यात सुगंधित मावा, तंबाखू आणि फुलचंद पान यासारख्या घातक अन्नपदार्थांवर बंदी असतानाही त्यांची खुलेआम विक्री सुरू होती. परंतु अलीकडे शेवगाव तालुक्यात पोलिसांनी केलेल्या मोठ्या कारवाईनंतर पाथर्डी शहर आणि तालुक्यातही मोठा खळबळ उडाली आहे. मागील चार दिवसांपूर्वी शेवगावमध्ये सुगंधित तंबाखू, सुपारी आणि मावा तयार करणारी मशिनरी जप्त करत चार जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. याच्या धास्तीने पाथर्डीतील अनेक पान टपरीधारकांनी आपली दुकाने बंद केली आहेत.

गेल्या तीन दिवसांपासून फुलचंद पान आणि मावा विक्रेत्यांच्या टपऱ्या अक्षरशः बंद आहेत.शहरातील काही टपरीधारक सुगंधित तंबाखू, मावा किंवा तंबाखूजन्य पदार्थ विक्री करत नसल्यामुळे त्यांच्या टपऱ्या मात्र सुरू असून धंदा तेजीत आहे. पण जे विक्रेते अशा बंदी असलेल्या पदार्थांची विक्री करत होते, त्यांनी पोलिसांच्या कारवाईचा चांगलाच धसका घेतला आहे. हे टपरीधारक



आता गुन्हे दाखल होण्याच्या भीतीने संपूर्णतः भूमिगत झाले आहेत. राज्य शासनाने अन्न व औषध प्रशासनाच्या अधिनियमांतर्गत १२ जुलै २०२४ रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार गुटखा, पानमसाला, चघळण्याची तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थांवर बंदी घालण्यात आली आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४७ मध्ये स्पष्टपणे नमूद केल्याप्रमाणे, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करणे ही राज्याची जबाबदारी मानली जाते.

### गुटखा आरोग्यासाठी घातक

विविध वैज्ञानिक अभ्यास व वैद्यकीय अहवालांद्वारे स्पष्ट झाले आहे की हे पदार्थ मुखाचा कर्करोग, अन्ननलिकेचा कर्करोग, हृदयरोग, प्रजनन आरोग्यावर परिणाम अशा गंभीर आजारांना कारणीभूत ठरतात.या पार्श्वभूमीवर पोलिसांनी आता गंभीर पावले उचलायला सुरुवात केली असून बंदी असूनही मावा विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जात आहे. त्यामुळे आगामी काळातही अशा अवैध टपऱ्यांवर सपाटून धाडी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# संपादकीय

## दोन घडींचा डाव...

जगण्याची भ्रांत आणि कसरत वाढत असताना स्थैर्याचे दोन क्षण शोधणारे जीव नाहक कवेत घेणाऱ्या, कोणत्या ना कोणत्या रुपात अकाली झडप घालून आपल्या सदनी नेणाऱ्या यमदुतांप्रती संताप वाढतो. काही दिवसांपूर्वी पहलगाममध्ये ते दहशतवाद्यांच्या भेसूर रुपात आले आणि देशाच्या नंदनवनातच सामान्यांच्या सुखस्वप्नांची राखरांगोळी करुन गेले. याच यमदुतांनी विजयाचा आनंद व्यक्त करणाऱ्या क्रिकेटप्रेमींना चेंगरले. रेल्वेमार्गावरील एका वळणावर प्रवाशांना ओढून घेतले. लगोलग त्यांचा मोर्चा अहमदाबादमध्ये वळला. उद्योगनगरी असणाऱ्या या शहरातील व्यस्त विमानतळामध्ये ते कधी आणि कसे दबा धरुन बसले हे कोणाला कळलेही नाही. त्यामुळेच हसत, प्रवास सुरू झाल्याने नि:श्वास सोडत, कमरेचे सीट बेल्ट सुटताच पुढचे दहा तास आकाशात निवांत विहार करण्याचे स्वप्न बघत विसावलेले जीव थेट आगीच्या लोळात खाक झाले. इतके की त्यांच्या शरीराचे तुकडे गोळा करणाऱ्यांनाही जन्माची भीती बसावी. हा भयावह अपघात पाहून देशच नव्हे तर अवघे जग स्तब्ध झालेले दिसले. यथावकाश यामागील कारणे, मृतांच्या नातलगांना आर्थिक मदत, आगीत नुकसान झालेल्या इमारतीची पुनर्बांधणी यासारखे उपचार पार पडतील आणि आणखी एक दुर्घटना काळाच्या तसेच स्मृतीच्या पडद्याआड जाईल. परंतु, मुळातच असे अपघात का होतात, उड्डाणानंतरचा वेळ सर्वाधिक धोक्याचा का असतो हा आणि यासारखा तपशील जाणून घ्यायला हवा. विमानाच्या टेकऑफचा वेळ हा विमान उद्योगातील सर्वात 'क्रिटिकल' काळ मानला जातो. आकडेवारीनुसार जगातील एकूण विमान अपघातांपैकी सुमारे ३५ टक्के अपघात टेकऑफ दरम्यान किंवा त्यानंतर होतात. 'टेकऑफ'नंतर हा दर लक्षणीयरीत्या कमी होतो. टेकऑफदरम्यान विमान जमिनीवरून उच्च वेगाने उड्डाण घेते. या काळात पायलटला धावपट्टी, इंजिन, हवामान आणि विमानाच्या यंत्रणेवर बारकाईने लक्ष ठेवावे लागते, कारण उड्डाणकाळात हे घटक सर्वाधिक महत्त्वाचे असतात. टेकऑफच्या वेळी इंजिन कमाल क्षमतेने काम करत असते. अशा परिस्थितीमध्ये इंजिनमधील कोणत्याही प्रकारचा तांत्रिक बिघाड (जसे की पक्षी धडकणे, इंधन दाबाची समस्या किंवा उत्पादन दोष) त्वरित अपघातास कारणीभूत ठरू शकतो. त्याचबरोबर 'टेक ऑफ'दरम्यान पायलटची चूक हे विमान अपघाताचे एक प्रमुख कारण असू शकते. पायलट स्वत: पिच अँगल, वेग किंवा रनवे लिफ्ट ऑफ पॉइंटबद्दल चुकीचा निर्णय घेतो तेव्हा परिस्थिती गंभीर होऊ शकते. बहुतेक विमान अपघात टेकऑफ आणि लँडिंगदरम्यान होणाऱ्या मानवी चुकांमुळे होतात. याचबरोबर टेकऑफदरम्यान खराब हवामान हे देखील विमान अपघाताचे एक प्रमुख कारण आहे. जोरदार वारे, कमी दृश्यमानता (धुके किंवा धुरके), वादळ किंवा मायक्रोबर्स्ट (जोरदार वारा) यासारख्या परिस्थिती अनेकदा अपघातांना कारणीभूत ठरते. अलिकडेच, दिल्लीमध्ये खराब हवामानामुळे एक विमान टर्ब्युलन्समध्ये (हवेचे जोरदार झोके) अडकण्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. थोडक्यात, हवामानाची साथ नसेल तर विमानप्रवास धोक्यात येऊ शकतो. 'टेक ऑफ'दरम्यानच्या विमान अपघातात तांत्रिक बिघाडदेखील महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. विमानाच्या लँडिंग गियर, ऑटोथ्रॉटल सिस्टीम, हायड्रॉलिक्स किंवा एअरस्पीड इंडिकेटरमधील कोणत्याही बिघाडामुळे अपघात होऊ शकतो. टेक ऑफ आणि लँडिंगदरम्यान दुरुस्तीसाठी खूप कमी वेळ असल्यास सिस्टीममधील कोणताही बिघाड अत्यंत धोकादायक ठरू शकतो.

पक्षी किंवा पक्ष्यांचा थवा विमानाला आदळण्याचा प्रश्न लक्षात घेतला तर ही शक्यताही नाकारता येत नाही. परंतु मोठा पक्षी किंवा पक्ष्यांचा थवा असेल तरच हे शक्य आहे. याचे कारण विमानतळाभोवती दुर्बिणीद्वारे पक्ष्यांच्या हालचालींचे निरीक्षण केले जात असते. त्यामुळे खूप पक्षी असतील तरच टक्कर होण्याची शक्यता असते. पक्ष्यांच्या टकरीमुळे एका इंजिनने काम करणे थांबवले असेल आणि दुसरे इंजिन नादुरुस्त झाले असेल, अशीही एक शक्यता आहे. अशा प्रकारे दोन्ही इंजिनची शक्ती कमी होते तेव्हा पायलटकडे विमान हाताळण्यासाठी जास्त वेळ नसतो. दुसरीकडे, गर्दीच्या क्षेत्रातून विमान बाहेर काढण्यासाठी वेग आवश्यक असतो. दोन्ही इंजिन सुरू असतात तेव्हाच वेग मिळवणे शक्य होते. त्यामुळेच या अपघातात दोन्ही इंजिन 'थ्रस्ट' अर्थात ताकद निर्माण करू शकले नाहीत, असे गृहीत धरुनही तपासाची दिशा ठरवली जाऊ शकते. तसे पाहिले तर विमानाने उड्डाण करण्यापूर्वी सर्व उपकरणे तपासली जातात. 'ड्रीमलाइनर'चा तपासणी इतिहास बोईंगशी शेअर केला जातो. हे एक प्रगत विमान आहे. त्यात तांत्रिक बिघाड होण्याची शक्यता कमी आहे. इथे लक्षात घेण्यासारखी आणखी एक बाब म्हणजे विमान शेवटच्या क्षणापर्यंत नियंत्रणात होते. पायलटने इमारतीला होणारी धडक वाचवण्याचाही प्रयत्न केला. परंतु ते पुढे जाऊ शकले नाही. म्हणजेच विमानाची दोन्ही इंजिन्स नादुरुस्त झाली होती. यामुळे विमानाचा वेगही कमी होता. एव्हिएशन सेफ्टी नेटवर्कच्या माहितीनुसार २००९ मध्ये सेवेत आल्यानंतर ड्रीमलायनर विमानाचा हा पहिलाच अपघात आहे. पण त्याने शिकवलेला धडा मात्र खूप मोठा आहे. आता वर स्पष्ट केलेल्या सर्व शक्यता लक्षात घेऊन अपघाताची नेमकी कारणे शोधण्यासाठी चौकशी सुरू झाली आहे. मात्र या घटनेने पुन्हा एकदा हवाई सुरक्षेचे महत्त्व आणि उड्डाणाच्या प्रत्येक टप्प्यावर घ्यावयाच्या खबरदारीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या अपघातातील २७५ जणांचे मृतदेह हाती आले. वाचलेल्या एकमेव व्यक्तीवर उपचार सुरू आहेत. या अपघाताची भीषणता रस्त्यांवर विखुरलेल्या मृतदेहांवरूनही समजण्याजोगी होती. बहुतेक मृतदेह गंभीरपणे जळाले होते. त्यांची ओळखही पटत नव्हती. अचानक इतक्या गंभीर जखमींवर उपचार करताना, मृतदेहांची ओळख पटवताना, डीएनए टेस्ट करुन आप्तेष्टांकडे मृतदेह सोपवताना प्रशासकीय यंत्रणेवर किती ताण आला असेल, हे आपण समजू शकतो. अपघातानंतर मदत आणि बचाव कार्य आणखी काही दिवस सुरू राहणार आहे. अपघातामुळे घटनास्थळाचे तापमान इतके वाढले होते की त्यामुळे सुरूवातीला बचावकार्यात मोठ्या अडचणीने आल्या. या अपघातापासून धडा घेत काम केले जाईल आणि नाहक मनुष्यहानी होणार नाही, अशीच आशा करु या.

# भविष्यातील क्रांतीचे प्रतिक ठरणारे तंत्रज्ञान




तंत्रवेध

– डॉ. दीपक शिकारपूर

सध्या प्रत्येकाच्याच हाती स्मार्टफोन्स दिसू लागल्याने हँडसेटवरून 'लाइव्ह स्ट्रीमिंग व्हीडिओ' पाहणाऱ्यांची संख्या विलक्षण वाढणार आहे. ६जी हे पुढील पिढीचे वायरलेस कम्युनिकेशन तंत्रज्ञान आहे, जे ५जीपेक्षा खूपच वेगवान, विश्वासार्ह आणि अनेक नवीन क्षमतांसह अवतरणार आहे. हे तंत्रज्ञान आपल्या दैनंदिन जीवनात क्रांती करेल. '६जी' म्हणजे नक्की काय हे समजण्यासाठी मोबाईलचा इतिहास नीट समजून घ्यावा लागेल.

इलेक्ट्रॉनिक युगाच्या सुरूवातीपासून (सुमारे १९७०) गेल्या ४५ वर्षांमध्ये सर्वाधिक वेगाने प्रसार झालेले उपकरण म्हणजे सेलफोन. या बाबतीत त्याने संगणकाला केव्हाच मागे टाकले. किंबहुना, हँडसेटमध्येच आता परिपूर्ण संगणक समाविष्ट झाला आहे. आता सेलफोन हवा असण्याच्या गरजेचे रूपांतर वेडामध्ये झाले आहे. इतके की, रोटी-कपडा-मकान सारख्या जीवनावश्यक गोष्टींमध्येच लोक आता कळत-नकळत सेलफोनचाही समावेश करू लागले आहेत. गेल्या दहा वर्षांमध्ये मोबाइल फोनच्या हँडसेटचे स्वरूप किती बदलले हे सांगायला नकोच. हँडसेट लहान आणि हलके बनले आणि मुख्य म्हणजे त्याद्वारे मिळणाऱ्या सुविधांमध्ये आश्चर्यकारक वेगाने वाढ झाली. सध्या प्रत्येकाच्याच हाती स्मार्टफोन्स दिसू लागल्याने हँडसेटवरून 'लाइव्ह स्ट्रीमिंग व्हीडिओ' पाहणाऱ्यांची संख्या विलक्षण वाढणार आहे. ६जी हे पुढील पिढीचे वायरलेस कम्युनिकेशन तंत्रज्ञान आहे, जे ५जीपेक्षा खूपच वेगवान, अधिक विश्वासार्ह आणि अनेक नवीन क्षमतांसह येणार आहे. हे तंत्रज्ञान आपल्या दैनंदिन जीवनात क्रांती करेल. '६ जी' म्हणजे नक्की काय हे समजण्यासाठी आपल्याला मोबाईलचा इतिहास समजून घ्यावा लागेल. यातील 'जी' म्हणजे 'जनरेशन'. आपण याला आपल्या भाषेत पिढी अथवा आवृत्ती म्हणू.

सेल्युलर मोबाईल सेवा सर्वात आधी रेडिओ टेक्नोलॉजी वापरत असे. तीच 'फर्स्ट जनरेशन' मानले जाते. त्या वरून फक्त कॉल करता येत असत. त्यानंतर रेडिओ टेक्नॉलॉजी नेटवर्कचे डिजीटल नेटवर्कमध्ये रुपांतर झाले. त्याला २जी असे संबोधले जाते. २जी मध्ये इंटरनेटची सुविधा नव्हती. २जीने एसएमएस (शॉर्ट मेसेजींग सर्विस) या सुविधेचा प्रथम वापर सुरु केला. त्यानंतर मोठ्या प्रमाणात पसरल्या गेलेल्या आणि अधिक चांगल्या सोयी जास्त वेग व संपूर्ण सुधारीत आवृत्तीला ३जी म्हणता येईल. इंटरनेट मोबाईलवर आले ते ३जीमुळे. स्मार्टफोनच्या आगमनानंतर लोक डेटा मोठ्या प्रमाणावर वापरायला लागले. त्यामुळे अधिक जलद इंटरनेटची गरज भासू लागली. त्यातून ४जी नेटवर्कचा जन्म झाला मोबाईल नेटवर्कच्या या चौथ्या आवृत्तीतील मुख्य सुधारणा म्हणजे अधिक जलद इंटरनेट सुविधा. ५जी तंत्रामुळे आपण फक्त स्मार्टफोन नव्हे तर, सर्व उपकरणे जोडू लागलो. ५जी मोबाईल नेटवर्कमध्ये खूप जास्त बँडविड्थ उपलब्ध होईल आणि मोबाईल इंटरनेट अतिशय जलद असल्याचा अनुभव येईल. 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' या संकल्पनेमुळे आता जवळजवळ प्रत्येक इलेक्ट्रॉनिक उपकरण इंटरनेटला जोडले जात आहे. स्मार्टफोनप्रमाणेच इतरही अनेक वस्तू आणि उपकरणे हुषार झाली असून इंटरनेट, ब्ल्यूटूथ, निअर फ्रीक्वेन्सी (एनएफ) इ. मार्गांनी परस्परांशी संवाद साधू लागली. वापरकर्त्याने आपल्या विशिष्ट गरजा एकदा स्मार्ट उपकरणांना सांगितल्या की ती उपकरणे एकमेकांशी 'बोलून' स्वतःच निर्णय घेऊ शकतात.

आता ६जी कडे वळू. ६जीची गती ५जीपेक्षा अनेक पट जास्त असणार आहे. ६जी हे एक अत्यंत वेगवान, अविश्वसनीय आणि अत्यंत सुरक्षित वायरलेस कम्युनिकेशन स्टँडर्ड आहे. हे आपल्याला उच्च-गुणवत्तेचे व्हिडिओ कॉलिंग, आभासी वास्तविकता, ऑगमेंटेड रियलिटी आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज सारख्या अनेक तंत्राचा व्यावहारिक अनुभव देऊ शकेल. टेराहर्ट्ज तरंगांचा वापर करून ६जी सेवा अधिक डेटा प्रवाहीत करण्यास सक्षम असेल. नेटवर्क स्लाइसिंगमुळे नेटवर्कला वेगवेगळ्या अनुप्रयोगांसाठी ऑप्टिमाइझ केले जाऊ शकते. ६जी तंत्रज्ञान खूपच जटिल आहे आणि त्याच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात संशोधन आणि विकास आवश्यक आहे. नोकिया, एरिक्सन, हुआवेई आणि सॅमसंग हँडसेट उत्पादक किंवा सेवा प्रदाते ६जीवर चालू शकणाऱ्या मूलभूत अत्यावश्यक प्रणाली विकसित करण्यात अग्रेसर आहेत. ६जी तंत्रज्ञान नवीन रेडिओ फ्रिक्वेन्सीवर कार्य करेल आणि लक्षणीय वेग, अधिक कार्यक्षमता प्राप्त करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करेल. ६जी उद्योग आणि तंत्रज्ञान इकोसिस्टीम खरोखरच जागतिक आहे. सध्याचे प्रमुख ६जी संशोधन प्रकल्प जपान, अमेरिका, चीन, दक्षिण कोरिया, जर्मनी, फिनलंड आणि विस्तीर्ण युरोपियन युनियनमध्ये होत आहेत. त्यातले नवीन नाव म्हणजे आपला भारत. हे सर्व प्रत्यक्षात आणण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच मोबाईल काँग्रेसमध्ये मोठी घोषणा केली. दूरसंचार विभागाने 'भारत ६जी व्हिजन' तयार करण्यासाठी तंत्रज्ञान अभिनव गट स्थापन केला आहे.

२०३० पर्यंत भारतात ६जी तंत्रज्ञान विकसित करण्याचे धोरण आहे. या व्हिजनचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे ६जी नेटवर्क तंत्रज्ञान तयार आणि तैनात करणे; जे सुरक्षित, बुद्धिमान आणि व्यापक कनेक्टिव्हिटी प्रदान करेल आणि नागरिकांना चांगले जीवन जगण्यास सक्षम करेल. इंटरनॅशनल टेलीकम्युनिकेशन युनियन, टेलिकॉम मानकांच्या विकासावर देखरेख करणारी आणि जगभरातील स्पेक्ट्रम आणि सॅटेलाइट ऑर्बिट रिसोर्सेचे व्यवस्थापन करणारी संयुक्त राष्ट्रांची संस्था आहे. या संस्थेने ६जी व्हिजन फ्रेमवर्क स्वीकारले आहे. ६जी प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये राबवण्याचा प्रस्ताव आहे. पहिला टप्पा २०२३ ते २०२५ दरम्यान आकाराला येईल. पहिल्या टप्प्यात अन्वेषणात्मक कल्पना, संघर्षमय तंत्र विकास आणि संकल्पनेचा पुरावा चाचण्यांना समर्थन प्रदान केले जाईल. दुसरा टप्पा २०२५ ते २०३० या काळात आकाराला येईल. जागतिक समविचारी गटाद्वारे स्वीकृतीसाठी वचन आणि क्षमता दर्शवणाऱ्या संकल्पनांना ६जी प्रकल्पाच्या व्यावसायिकीकरणाकडे नेणारे अंमलबजावणीत्मक समर्थन दिले जाईल. ६जी साठी पायाभूत सुविधांमध्ये भरीव गुंतवणूक आवश्यक आहे. उदाहरणार्थ, वेव्ह प्रसारित करणे आणि प्राप्त करणे अधिक कठीण आहे. त्यामुळे ६जी नेटवर्कला नवीन अँटेना डिझाइन आणि सिग्नल प्रक्रिया तंत्र वापरण्याची आवश्यकता असेल. सहाव्या पिढीचे वायरलेस नेटवर्क तंत्रज्ञान उच्च कव्हरेज, कमी ऊर्जेचा वापर, सर्वसमावेशक स्पेक्ट्रम आणि सुधारित सुरक्षिततेसह किफायतशीरपणा प्रदान करेल असा अंदाज आहे

विस्तारित वास्तविकता आणि मिश्रित वास्तविकता मोबाइलच्या या सहाव्या पिढीचा भाग असेल. शंभरच्या आसपास फ्रिक्वेन्सीवर ६जी ऑपरेट करते. हे संवेदनांचे इंटरनेट आहे, भौतिक आणि आभासी जगाचे संमिश्रण हे ६जीचे वैशिष्ट्य आहे. पुढील दशकात स्मार्ट उपकरणांना आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्स) या तंत्रामुळे सर्वत्र इंटरनेट बॅण्डविड्थ लागेल. इथेच ६जी कामाला येईल. यामुळे मोबाईल कॉल्स वेगळ्या दर्जाचा अनुभव देतील. आत्ता आपण द्विमिती व्हिडिओ जमान्यात आहोत. ६जीमुळे मानवी आकाराचे ३ डी होलोग्राम प्रदर्शन शक्य होते. आपण संपर्क साधत असू शकणाऱ्या व्यक्ती रिअल टाइममध्ये (जशा आहेत तशा; प्रोफाइल चित्र नव्हे) आपल्याजवळ प्रगट होतात. अनेक पौराणिक टीव्ही सिरिअल्समध्ये मानवाच्या समोर देवदेवता प्रगट झाल्याचे दाखवले जाते. ६जी होलोग्राम तंत्रामुळे हे तंत्र सर्वसामान्यांना उपलब्ध होईल. यामुळे दळणवळण क्षेत्रात क्रांती होईल. २०२६ च्या मध्यास हे प्रायोगिक तत्वावर सुरु होईल आणि २०३० पर्यंत सर्वत्र उपलब्ध होईल. त्यामुळे पारंपरिक द्विमिती मोबाईल फोनचा नक्कीच अस्त होईल. आपण ६जी तंत्रज्ञान यशस्वीरित्या कार्यान्वित केल्यास देशाला एक तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत राष्ट्र बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावू शकू. भारताला वैश्विक स्तरावर एक तंत्रज्ञान नेता देश म्हणून प्रस्थापित करण्यात ६जी तंत्रज्ञान मदत करेल. विसाव्या शतकात आपली प्रतिमा तंत्रज्ञान आयातदार देश अशी होती. आता आपण प्रगत व निर्यातप्रधान म्हणून ओळखले जाऊ. आणि हीच या नवतंत्रज्ञानाची खासियत असेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

# आ. जगतापांच्या हस्ते घाडगेंना पुरस्कार प्रदान

## अण्णा हजारेंसह डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिल्या शुभेच्छा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भिंगार येथील प्रसिद्ध ज्योतिषाचार्य तुषार घाडगे यांना स्नेहबंध फाउंडेशन आयोजित महाराष्ट्र गौरव पुरस्काराने आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

यावेळी स्नेहबंध फाउंडेशनचे संस्थापक डॉ. उद्धव शिंदे, अमित खामकर, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, शिल्पकार प्रमोद कांबळे, पूनम घाडगे आदी उपस्थित होते. राज्यातील, जिल्ह्यातील विविध क्षेत्रात समाज हिताचे उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तीस,त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा, पुढील कार्य करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी स्नेहबंध फाउंडेशनने महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ करिता कला, क्रीडा, शिक्षण, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांना हा पुरस्कार प्रदान केला.



भिंगार येथील प्रसिद्ध ज्योतिषाचार्य तुषार घाडगे गेल्या ३५ वर्षापासून ज्योतिष विशारद म्हणुन काम करीत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना ज्योतिष विशारदमध्ये महामेरू, शिरोमणी, तिलक, एस्ट्रो आयकॉनिक असे पुरस्कार मिळालेले आहेत. इंदोर येथे आशिया टॉप टेन हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. या सर्वांची दखल घेऊन स्नेहबंध फाउंडेशनने महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले.आ.जगताप यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, शाल,श्रीफळ देऊन सपत्नीक घाडगे यांचा गौरव करण्यात आला.

### घाडगे यांना मान्यवरांकडून शुभेच्छा

महाराष्ट्र गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल तुषार घाडगे यांचे अण्णासाहेब हजारे, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, फिनिक्स फाउंडेशन, हरदिन मॉर्निंग ग्रुप यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे. ग्रुपचे संजय सपकाळ, जालिंदर बोरुडे यांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# कोटाच्या विद्यार्थ्यांनी मारली नीट परीक्षेत बाजी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : नुकताच नीट व जीईई आणि सीईटी परीक्षांचे निकाल जाहीर झाले असून यामध्ये कर्जत येथील कोटा मेंटॉर्स माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामधील विद्यार्थ्यांनी राज्यामध्ये बाजी मारली आहे. या विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांची एमबीबीएस व आयआयटी याच प्रमाणे नामांकित इंजिनिअरिंग कॉलेजसाठी निवड झाली आहे, असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष केशव आजबे म्हणाले.



कर्जत येथील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सातत्याने राज्य व देश पातळीवर नीट व जेईई या परीक्षांमध्ये यश मिळवणाऱ्या कोटा मेंटॉर्स माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यावर्षी देखील राज्य पातळीवर बाजी मारली आहे. या निमित्ताने या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा विद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी केशव आजबे, प्राचार्य रेणू रॉय व प्राचार्य विशाल केरूळकर व मोठ्या संख्येने सत्कारमूर्ती व त्यांचे आई-वडील आणि विद्यार्थी उपस्थित होते. या विद्यालयातील नीट परीक्षेत प्रतीक्षा अनारसे हिला गुण व साक्षी खेडकर हिला ५१६ गुण मिळाले. जेईई ॲडव्हान्स परीक्षेत श्रीकांत कदम याने ९९.७५ टक्के गुण मिळवून आयआयटीसाठी पात्रता मिळवली, तर मिताली पोपळे हिला ९९.५ टक्के गुण प्राप्त झाले.

एमएचटी सीईटीमध्ये वैष्णवी पाडुळे ९५.४८, योगिता गायकवाड ९४.३१, समर्थ राऊत ९४.२५, दीक्षा गंगावणे ९३, संकेत मदने ९२.०७, निळकंठ पोटरे ९१.९७ व मेघराज खिळे ९१.३० यांनी उल्लेखनीय यश मिळवले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना यापूर्वी जेईई व नीट परीक्षांच्या तयारीसाठी मोठ्या शहरांमध्ये जाऊन हजारो रुपये खर्च करावे लागत होते. राहण्याचा व इतर प्रश्न सातत्याने निर्माण होत होता. ग्रामीण भागातील गरीब शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी चांगल्या व दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहत होते. यामुळे कोटा मेंटॉस या विद्यालयाने ही सर्व उणीव भरून काढले असून मागील काही वर्षांपासून या विद्यालयातील विद्यार्थी देशपातळीवर आपले नाव निर्माण करत आहेत.

**– केशव आजबे**

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## बाजारपेठेतील रखडलेली कामे पूर्ण करा

वैरागर, रोहिदास भालेराव, देवराम शिंदे, दीपक काकडे, आकाश आल्हाट, आनंद जवंजाळ आदींसह शिवसैनिक उपस्थित होते. काळे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, पावसाच्या पाण्यामुळे रस्त्यावर साचलेला कचरा कुजल्यामुळे प्रचंड दुर्गंधी सुटली आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मनपाला आजवर अनेक वेळा स्वच्छतेच्या उत्तम कामगिरीबद्दल शासनाची विविध नामांकन व पारितोषिक प्राप्त झाल्याचा गवगवा सातत्याने केला जातो. मात्र चित्रा टॉकीजसह संपूर्ण शहरातील नागरिकांना प्रत्यक्ष दैनंदिन जीवनामध्ये कचरा संकलनाच्या बाबतीमध्ये येणारा अनुभव हा अत्यंत वाईट आहे. शहराच्या अनेक भागांमध्ये आजही घंटागाडी दररोज येत नाही. आलीच तर त्याच्या वेळा निश्चित नाहीत. त्यातही ती एखाद्या परिसरात गेली तर नागरिक बाहेर येऊन कचरा टाकण्या आधीच गाडी पुढे निघून गेलेली असते. नागरिक दोन दिवसांपेक्षा अधिक काळासाठी घरामध्ये कचरा साठवून ठेवू शकत नाहीत. नाइलाजास्तव हा सर्व कचरा नागरिकांना रस्त्यावरच टाकण्याची अपरिहार्यता निर्माण होते, असे निवेदनात म्हटले आहे.

मनपाच्या कचरा संकलन विभागाचा नियोजन शून्य कारभार या स्थितीला जबाबदार आहे. त्यामुळे संपूर्ण शहराची कचराकुंडी, उकिरडा झाला आहे. त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून मनपाला आजवर शहर स्वच्छतेची मिळालेली पारितोषिक आपण स्वतःहून ती शासनाला परत केली पाहिजेत. कारण ही बिरूदावली मिरविण्याचा कोणताही अधिकार हा मनपाला राहिलेला नसल्याचे काळे यांनी म्हटले आहे. काळे म्हणाले, पावसाळ्यापूर्वी मनपा प्रशासन झोपले होते काय? पावसाळ्यापूर्वी ही कामे सुरू करून पूर्ण करण्याची गरज होती. मात्र ऐन पावसाळ्यामध्ये हा संपूर्ण परिसर अक्षरशः एकाच वेळेला दोन्ही बाजूने खोदून ठेवून या परिसरातील नागरिक, व्यापाऱ्यांचे तसेच मोठ्या प्रमाणावर या भागातून जाणाऱ्या नगरकरांचे जगणे मुश्किल केले आहे, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. काळे म्हणाले, बरं एवढेच नाही तर या परिसरामध्ये मार्कंडेय विद्यालय, प्रगत विद्यालय, कै. वि. ल. कुलकर्णी प्रशाला, पुढील बाजूला बाई इचरचबाई प्रशाला, यासारख्या मोठ्या शाळा तसेच स्नेहालय संचलित उडान प्रकल्प, अनाम प्रेम सारखी सामाजिक संस्था असून यामधून हजारो विद्यार्थी, पालक रोज ये जा करतात. गांधी मैदान आणि परिसरामध्ये दूध, भाजीपाला विक्रेते तसेच अन्य व्यापारी आस्थापना व रहिवासी देखील राहतात. या सगळ्यांच्या रोजगार आणि राहण्यावर याचा गंभीर परिणाम होत आहे.

विद्यार्थ्यांचा, नागरिकांचा अपघात झाला तर रुग्णालयापर्यंत पोहचणे सुद्धा शक्य होणार नाही अशी परिस्थिती आहे. हीच परिस्थिती शहराच्या मध्यवर्ती भागात बहुतांश ठिकाणी असून विकास कामांच्या नावाखाली बाजारपेठेचे अर्थकारण संपूर्ण बाजारपेठ एकाच वेळी खोदून ठेवल्यामुळे प्रचंड अडचणीत आले आहे. यामुळे बाजारपेठ, व्यापारी उध्वस्त होण्याची वेळ आली आहे. लहान मुलं, विद्यार्थी, पालक, व्यापारी, ग्राहक अशा सर्वांनाच वेठीस धरण्याचं काम मनपा प्रशासन करीत आहे.आयुक्त, मनपा अधिकारी, शहराचे लोकप्रतिनिधी, सत्ताधारी महायुतीचे माजी आणि भावी नगरसेवक शहरात सध्या विविध ठिकाणी भेटी देत फोटोसेशन करताना नगरकरांना पाहायला मिळतात. मात्र प्रत्यक्षात नियोजन शून्य काम आणि कामांना नसणारी गती, अनेक वेळा बंद पडणारी कामं, यामुळे महिनोन महिने हा प्रकार असाच सुरू राहण्याचे चित्र दिसते आहे.

## माहेगाव देशमुखच्या दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

पाऊस सुरु असून पांडुरंग परमात्मा सर्व वारकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. तरी देखील सर्वांनी योग्य प्रकारे आपली काळजी घ्यावी व पांडुरंगाचे मनभरून दर्शन घेवून सुखरूप परत यावे असा त्यांनी भावनिक सल्ला दिला. यावेळी माहेगावदेशमुख ग्रामस्थ व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुम्ही मालक नाही, सेवक आहात

मोठी समस्या शिवाजी रोड संगमनेर रोडवरील असलेल्या बँकांची असून सदर बँकांना ना हरकत देताना पार्किंग असल्याचे बघितले होते का? तसेच मोठ्या शहरांप्रमाणे पार्किंगसाठी सम-विषम पद्धत राबविण्याचे सुचित केले. सध्या चालू असलेले चौक सुशोभीकरणाचे काम हे चुकीच्या पद्धतीने चालू असून वाहतुकीचे नियोजन कसे करणार स्मारके चौक सुशोभीकरण यापेक्षाही चांगल्या जागी केल्यास शहराच्या सौंदर्यात भर पडून नागरिकांना देखील त्रासाला सामोरे जावा लागणार नसल्याचे गुजर म्हणाले. यावेळी मा. सभापती बाबासाहेब दिघे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, ज्ञानेश्वर मुरकुटे, अण्णासाहेब डावखर, प्रमोद भोसले, मुजफ्फर शेख, दिलीप नागरे, राजेंद्र सोनवणे, रमण मुथा, नागेश सावंत, सुनिल बोलके, अशोक थोरे, लकी सेठी, रितेश रोटे, भरत कुंकूलोळ, प्रसाद चौधरी, सुधिर वायखिंडे, निखिल पवार, राजेंद्र भोसले, निलेश नागले, जावेद शेख, रियाज पठाण, रज्जाक पठाण, प्रवीण नवले, रावसाहेब आल्हाट, संतोष परदेशी, रितेश एडके, मास्टर सरवरआली, सुनील साबळे, गणेश काते, बाबा वायदंडे, सतीश पाटणी, रितेश चव्हाणके, विशाल साळवे, रफिक शेख, जियान पठाण, परेश गाडेकर, वैभव कुर्हे, सनी मंडलिक, राजेश जोंधळे कल्पेश पाटणी, सागर दुपाटी यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. सुमारे साडेतीन तास चाललेल्या बैठकीमध्ये उपस्थित नागरिकांनी अनेक प्रश्न उपस्थित केले व त्या प्रश्नांवर संबंधित अधिकाऱ्यांकडून उत्तरे देखील घेण्यात आले यावेळी पत्रकार बांधव देखील उपस्थित होते.

## कंटेनरने महिलेला चिरडले

अपघातग्रस्तांना मदत न करताच पळून गेला आहे. याबाबत जखमी रामकृष्ण माधव महाले यांच्या फिर्यादीवरून कोपरगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला असून सदर घटनेचा पुढील तपास कोपरगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हेड. बी. एच. तमनर हे करत आहे.

# गॅस सिलेंडर चोरणाऱ्यांना केली अटक

## ९ आरोपींविरोधात गुन्हा दाखल; वाशीमध्ये सापडले सिलेंडर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी येथून भारत गॅस कंपनीच्या गोडावूनचे कुलूप तोडून सुमारे १३० गॅस सिलेंडर चोरून नेले होते. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून काही आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, दि. १० जून २०२५ रोजी फिर्यादी नामे सुनिल अंकुशराव बेळगे (वय ३४, रा. पाथर्डी) यांचे चिंचपूर इजदे येथील भारत गॅस कंपनीच्या मोहटादेवी गॅस गोडाऊनचे अज्ञात आरोपीतांनी कुलूप तोडून भारत गॅस कंपनीच्या भरलेल्या गॅस टाक्या चोरून नेल्या. याबाबत पाथर्डी पोलीस स्टेशनलक घरफोडीचा गुन्हा दाखल झाला होता.

दरम्यान पोलीस अधिक्षक,अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस (लोकल क्राईम ब्रांच-एलसीबी) आदेश दिल्यावरून पो. नि. दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकातील दत्तात्रय हिंगडे यांनी गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना व मार्गदर्शन करुन पथकास रवाना केले.

गुन्हयाचा तपास करत असताना गोपनीय व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे सदरचा गुन्हा रेकॉर्डवरील आरोपी राजेंद्र गुलाब काळे (रा. कासारखानी, ता. वाशी, जि. धाराशीव) याने त्याच्या साथीदारासह केला असून ते वाशी, ता. वाशी, जि. धाराशीव गावचे परिसरात असल्याची माहिती प्राप्त झाली. पथकाने मिळालेल्या माहितीतील ठिकाणी जाऊन संशयीत आरोपीचा शोध घेत असताना, आरोपीस पोलीस पथकाची चाहुल लागताच तो पळून जाऊ लागला.पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करून राजेंद्र गुलाब काळे (रा. कासार खानी, ता. वाशी, जि. धाराशीव) यास ताब्यात घेतले. पथकाने ताब्यातील आरोपीकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपूस केली असता त्याने त्याचे साथीदार सुंदर शंकर शिंदे, रामा सुबराव काळे, गुलाब गुंपूर काळे, सुनिल लगमण पवार , दत्ता लगमण पवार, लगमण भिसराम पवार, शंकर सुरेश काळे, माणीक गुलाब काळे यांनी मिळून सुनिल लगमण पवार याचे स्कॉर्पिओ गाडी क्रमांक एमएच-१४-सीव्ही-१२१२ व रामा सुबराव काळे याचे सहाचाकी ट्रक क्रमांक माहित नाही, अशी वाहने घेऊन मागील दहा दिवसापुर्वी पाथर्डी तालुक्यातील एक गॅस गोडावूनचे कुलूप तोडून गॅस टाक्या चोरल्याची माहिती सांगीतली.



### ५ लाखांचा मुद्देमाल केला जप्त

पथकाने गुन्हयात चोरलेल्या गॅस टाक्याबाबत आरोपीस विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने चोरलेल्या गॅस टाक्या या राहुल हनुमंत चेडे (रा. शिवाजीनगर, वाशी, ता. वाशी, जि. धाराशीव) याचेकडे ट्रक खराब झाल्याने त्यांच्या हॉटेलमध्ये ठेवल्याची माहिती सांगीतली. पथकाने राहुल हनुमंत चेडे यास गॅस टाक्या हजर करणेबाबत कळविले. पथकाने पंचासमक्ष राहुल हनुमंत चेडे याने हजर केलेल्या ५ लाख २० हजार रूपये किंमतीच्या १३० भारत गॅस कंपनीच्या टाक्या तपासकामी जप्त करण्यात आल्या आहेत.



## राज्यात पाऊस पुन्हा सुरु

### हवामान खात्याचा अंदाज बघा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** सध्या संपूर्ण महाराष्ट्रात मान्सूनने जोरदार हजेरी लावली असून, हवामानात लक्षणीय बदल दिसून येत आहेत. राज्यातील बहुतांश भागांमध्ये सकाळपासूनच मध्यम ते जोरदार पावसाच्या सरी पडत आहेत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील पाच दिवस महाराष्ट्रातील कोकण, घाटमाथा, विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागांत जोरदार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे काही जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट तर काही भागांसाठी ऑरेंज आणि रेड अलर्ट जारी करण्यात आले आहेत. विशेषतः पुणे, नाशिक आणि पालघर जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर आज (ता. २० जून) अतिजोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकणातील सर्व जिल्ह्यांमध्येही काही ठिकाणी मुसळधार पावसाचा धोका असल्याने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शाळांना लागू करण्यात आले नवीन वेळापत्रक



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून नवीन वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. खरंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात आता अंमलबजावणी होत आहे.

यंदाच्या वर्षापासून टप्प्याटप्प्याने नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होणार असून या नव्या धोरणानुसार नवीन वेळापत्रक सुद्धा लागू होणार आहे.

राज्यातील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. खरे तर सध्या स्थितीला ५ ऑक्टोबर २०१७ च्या शासन परिपत्रकानुसार पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना विषयावर तासिका विभागणी लागू आहे. पण १६ एप्रिल २०२५ रोजी च्या शासन निर्णयानुसार राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे. नवीन शैक्षणिक धोरण म्हणजेच न्यू एज्युकेशन पॉलिसी ही शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदापासूनच सुरू होणार आहे.

## जातप येथे शालेय साहित्य वाटप

### शिवसेनेच्या वर्धापनदिनानिमित्ताचे साधले औचित्य



**जनता आवाज वृत्तसेवा**

**देवळाली प्रवरा :** राहुरी तालुक्यातील जातप येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना आज गुरुवारी शिवसेना पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त शालेय साहित्य व फळ वाटप करण्यात आले.

शिवसेना शिंदे गट अध्यात्मिक आघाडीच्यावतीने या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चैतन्य उद्योग समुहाचे अध्यक्ष गणेश भांड होते. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या अध्यात्मिक आघाडीचे जिल्हाप्रमुख संपत काका जाधव, शिवसेना शेतकरी आघाडीचे तालुका प्रमुख किशोर मोरे, ह.भ.प नामदेव महाराज जाधव शास्त्री, तंटामुक्तीचे अध्यक्ष रावसाहेब शिंदे, दादासाहेब शिंदे, चंद्रभान वाघ,भास्कर बोंबले, अशोक बोंबले, सुधाकर कदम, प्रवीण जाधव, कृष्णा जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उद्योजक गणेश भांड, संपत जाधव, नामदेव महाराज शास्त्री यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक संदीप गायकवाड, नरोडे मॅडम, शिंदे मॅडम, काटे मॅडम सय्यद भाभी यांनी अथक परिश्रम घेतले.

## शाळा समोरील विद्युततारा काढा

### ऋणानुबंध कॉलनीत तारामध्ये गेल्या फांद्या

**जनता आवाज वृत्तसेवा**



**आहिल्यानगर :** सावेडीतील समर्थ शाळेमागे ऋणानुबंध कॉलनी असलेल्या मोकळ्या मैदानातील झाडांमध्ये विद्युततारा गेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहे. अनेक झाडाच्या फांद्यां विद्युत महावितरणाच्या मुख्य तारांवर गेलेल्या आहे. पावसाळ्यात वारा चालू झाला की तारा एकमेकांना चिकटतात व त्याचा करंट झाडात उतरतो व झाडातून घरांच्या कंपाउंडमध्ये उतरण्याची शक्यता आहे. हा रस्ता वरदळीचा नसला तरी येथे शाळेतील मुले खेळत असतात.

सदर विद्युत पुरवठा करणाऱ्या तारांवर असणाऱ्या झाडाच्या फांद्या कापण्यात याव्या या मागणीसाठी महावितरण व महानगरपालिका यांच्या कर्मचाऱ्यांशी अनेकदा संपर्क केला आहे तरी त्या काढल्या जात नाही तरी आता आयुक्तांनी लक्ष घालून लवकरात लवकर झाडांच्या फांद्या कापण्याची मागणी रहिवाशांनी केली आहे.

नुकतेच वादळी पावसामुळे शहर व उपनगर परिसरात अनेक ठिकाणी छोटी मोठी झाडे उन्मळून पडली. त्याच्या पडलेल्या फांद्या, पाने पडून कचरा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने उचलला पण असे अनेक ठिकाणी तारेतून गेलेल्या फ़ांद्या काढण्यात आल्या नाहीत त्यामुळे धोका निर्माण होऊ शकतो.

## डॉ. नाणेकर यांची नियुक्ती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील गोंधवणी येथील डॉक्टर नाणेकर यांची शिवसेना डॉक्टर सेल उपतालुकाप्रमुखपदी तथा आयुष होमिओपॅथी विंग तालुका प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. सदरची निवड शिवसेना वरिष्ठ स्तरावरून उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आली. यावेळी माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र तसेच सन्मान करण्यात आला. प्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख संतोष डहाळे पुरोहित रत्नाकर कोरडे, बाळासाहेब गायकवाड शिंदे महाराज, शिवसेना शहर व तालुका पदाधिकारी सर्वानुमते डॉ. नानेकर यांना शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. आभार ॲड. संतोष कांबळे यांनी मानले.

## वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या दिंडीचे प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** येथील वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे मंगळवार दिनांक २४ जून रोजी वैष्णव सेवा भक्त मंडळ पायी दिंडी सोहळा पंढरपूर आषाडी दिंडी साठी प्रस्थान करणार असून दिंडीचे हे १४ वे वर्ष आहे. ब्रम्हलीन समर्थ सद्गुरु हरिहर महाराज व ब्रम्हलीन शंकर महाराज जोशी, ब्रम्हत्तीन गोपाल चैतन्य महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या वतीने काढण्यात येते कपिलेश्वर महादेव मंदिर, माळीवाडा, अहमदनगर येथून दि. २४ जून रोजी दुपारी १ वा. वाजता निघणार आहे. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दिंडीची वाहन व्यवस्था (ट्रक) मोहनराव मेहेत्रे, जलव्यवस्था राजेंद्र फुलारी, डिझेलसेवा जगन औशीकर, रथसेवा बबन महाराज गुंजाळ तर पंढरपूर निवास व्यवस्था रावसाहेब भगत, किर्तन सेवा बाळकृष्ण महाराज खेसे यांची आहे.

## कारभारी घोरपडे यांचे निधन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** तालुक्यातील पिंपरी निर्मळ गावातील प्रगतीशल व्यक्तिमत्व कारभारी सारंगधर घोरपडे (वय ८५) नुकतेच निधन झाले. त्यांच्या पक्षच्यात मुलगा पिंपरी निर्मळ गावचे सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब कारभारी घोरपडे याचे ते वडील तर युवा नेते अनिकेत घोरपडे यांचे ते आजोबा होते. मुलगी नात सुन असा मोठा परिवार आहे.

## संकल्प पतसंस्थेच्या चेअरमनपदी सुजाता कदम




**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी फॅक्टरी येथील संकल्प नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी माजी नगरसेविका सुजाता सुधाकर कदम तर व्हाईस चेअरमनपदी भालचंद्र थोरात यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

संकल्प नागरी पतसंस्थेसाठी सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडली. काल मंगळवारी निवडणूक निर्णय अधिकारी एम. ए.शेख यांच्या अध्यक्षतेखाली चेअरमन व व्हा.चेअरमन पदासाठी निवड प्रक्रिया पार पडली.चेअरमन पदासाठी सुजाता सुधाकर कदम यांच्या नावाची सूचना अण्णासाहेब चोथे यांनी मांडली तर डॉ. शौकत सय्यद यांनी अनुमोदन दिले. व्हा. चेअरमनपदा भालचंद्र थोरात यांच्या नावाची पारसमल खिवंसरा यांनी मांडली तर विजयकुमार खळेकर यांनी अनुमोदन दिले.यावेळी आदर्श नागरी पतसंस्थेचे उपाध्यक्ष आबासाहेब वाळुंज, अमोल पवार, विक्रांत धुमाळ, मुकुंद वेदपाठक राजवर्धन कदम, कृष्णा कदम व संकल्प पतसंस्थेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रा. सुधाकर कदम, अण्णासाहेब चोथे, डॉ. शौकत सय्यद, विठ्ठल शेटे, विजयकुमार खळेकर, बबन डोंगरे, संदीप माने, पारसमल खिवंसरा, स्मिता वेदपाठक यांची संचालक पदी निवड करण्यात आली.

## गोदाकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातून व शहराजवळून वाहणाऱ्या गोदावरी नदीमध्ये नांदूर मधमेश्वर धरणातून १२ हजार क्यूसेस पाण्याचा विसर्ग केला आहे. तेव्हा नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत यांनी केले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, नाशिक जिल्ह्यात बुधवार पासून मुसळधार संततधार सुरू असल्यामुळे तसेच नाशिक क्षेत्रातील गंगापूर धरण, दारणा धरण, पालखेड धरण, या पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार सुरू असल्यामुळे सदरचे पाणी गोदावरी नदीपात्रात सोडले जात असल्यामुळे नदीपात्रात पाण्याचा वेग व पूर सदृश्य स्थिती निर्माण होऊ शकते त्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने या पाण्याची स्थिती लक्षात घेता नांदूर मधमेश्वर धरणातून सध्या १२ हजार क्यूसेस पाण्याचा विसर्ग गोदावरी नदीपात्रात केला आहे.

धरणातील पाण्याची परिस्थिती लक्षात घेता सदरचे पाणी टप्प्याटप्प्याने गोदावरी नदी पात्रात प्रवाहित करण्यात येणार आहे. तेव्हा नदीकाठच्या नागरिकांनी नदीमध्ये किंवा नदी किनारी असलेले आपले शेती पंप अथवा मोटारी सुरक्षित स्थळी काढून व्यवस्था करावी तसेच कोणीही या नदीच्या प्रवाहात जाऊ नये याबाबत ग्राम स्तरावरील प्रशासनाने आपापल्या स्तरावर नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी नागरिकांना अलर्ट करावे, असे आवाहन कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत यांनी केले आहे.

# पाडळी दर्या घाट दुरुस्तीसाठी टोलवा टोलवी

## जीवघेण्या अपघाताची शक्यता, जबाबदारी कोणाची?



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** पठार भागा खालील गावे पठारावरील भागाला जोडणारा महत्त्व पूर्ण असणारा देवीभोयरे फाटा ते पाडळी दर्या कान्हुर पठार रस्ता व घाटाची अत्यंत दयनिय अवस्था झाली असून पाडळी दर्या घाटात तर दोन ठिकाणी पावसामुळे रस्ता खचला असून त्याचे वार्तांकन जिल्ह्यातील सर्व वर्तमानपत्रांनी केले आहे, पण या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देण्यास ना राजकीय पुढाऱ्यांना वेळ, ना शासकीय अधिकाऱ्यांना वेळ . सर्वांनी अक्षरशः टोलवा टोलवी चालविली असून भीषण अपघाताची शक्यता निर्माण झाली असून अशी दुर्देवी घटना घडल्यास याला जबाबदार कोण? असा गंभीर प्रश्न महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा नगर जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील यांनी उपस्थित केला आहे.

> देवीभोयरे फाटा ते पाडळी दर्या, पिंपरी पठार मार्गे कान्हुर पठार मार्गावरील पिंपळगाव रोठा फाट्यापर्यंतचा १२ किलो मीटरचा रस्ता अत्यंत खराब झाला असून रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता, असा प्रश्न वाहन चालकांना पडल्याशिवाय राहत नाहीतर नवलचं. आजू बाजूच्या सर्वच गावांची रस्ते डांबरीकरणाने जोडली गेली आहेत. अपवाद फक्त पाडळी दर्या चाच रस्ता राहिला आहे.

या आठवड्यात जिल्हयातील सर्वच वर्तमानपत्रांनी वार्तांकना व्दारे पाडळी दर्या घाटाची दयनिय अवस्था छायाचित्राव्दारे समाज माध्यमांव्दारे समाजापुढे मांडली. या संदर्भात जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधला असता त्यांनी अक्षरशः टोलवा टोलवी चालविली असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता वसईकर म्हणतात की, हा रस्ता आमच्या कडे नाही तर जिल्हा परिषदेकडे आहे. तर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे उपअभियंता जगदाळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी पाडळी दर्या ग्रामपंचायतीला घाटाचे काम करण्याचे पत्र दिले. तर पाडळी दर्या ग्रामपंचायत ही आर्थिक दृष्ट्या सक्षम सक्षम नसल्याने घाटाचा गंभीर प्रश्न कोणी हाताळायचा हा मोठा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे .

जिल्हयातील वर्तमान पत्रांनी आपापल्याने पद्धतीने वार्तांकन करून जबाबदारी प्रामाणिक पार पाडली आहे. तर खा. निलेश लंके, आ. काशिनाथ दाते हे आपापल्या दैनंदिन कामांमध्ये व्यस्त असल्याने व राज्यात सत्ताधारी असलेले पारनेर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार, भारतीय जनता पक्ष, शिवसेना एकनाथ शिंदे आणि विरोधी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, शिवसेना उद्धव ठाकरे यांचे राजकीय पुढारी, कार्यकर्ते यांना या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देण्यास वेळच मिळत नाही.

# बा पांडुरंगा बळीराजा सुखाचा ठेव : आ. ओगले

## संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे श्रीरामपूर नगरीत उत्साहात स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** आपल्या श्रीरामपूर पुण्यनगरीतून संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांची पायी दिंडी सोहळा मार्गस्थ होतो आपण सर्वजण पुण्यवान आहोत की संतांचे स्पर्श आणि त्यांची सेवा करण्याची संधी तुम्हा आम्हला प्राप्त होती प्रभू पांडुरंगाच्या चरणी एकच प्रार्थना आहे. की बळीराजा सुखाचा ठेव, असे प्रतिपादन आ. हेमंत ओगले यांनी केले.

> याची देही याची डोळा अनुभवावा असा सोहळा म्हणजे पंढरपूर वारी. ऊन-वारा, तहान-भूक विसरून फक्त आणि फक्त पांडुरंगाचे दर्शन हाच ध्यास घेऊन वारकरी शेकडो किलोमीटर पायी वारी करत आहे.
>
> **– करण ससाणे, माजी उपनगराध्यक्ष**

श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ पालखी सोहळ्याचे श्रीरामपूर नगरीमध्ये स्वागत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, सभापती डॉ. वंदना मुरकुटे, माजी सभापती आशाताई दिघे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, नगरसेवक दिलीप नागरे, युवा काँग्रेसचे सचिव दिपाली ससाणे, प्रशांत ओगले, बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, राजू चक्रनारायण, रितेश रोटे, कलिम कुरेशी, मुन्ना पठाण, अशोक थोरे, लकी सेठी, सुनिल बोलके, नितिन पिपाडा, श्याम आडांगळे, आशाताई परदेशी, विलास लबडे, प्रवीण नवले, लाहानु त्रिभुवन यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.



# पोलीस यंत्रणा समाजाचा तिसरा डोळा : ॲड. येवले



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नुकतेच झालेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीत नागरिकांचे जीव वाचविणारे आणि अपघात दाखवून कटकारस्थान रचून झालेला खून प्रकरण उजेडात आणणारे नगर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशविन कुमार गीते यांचा महिला वकीलांनी सन्मान केला. महिला बाल कल्याण समितीच्या सदस्या ॲड. अनुराधा येवले यांनी गीते यांचा सत्कार केला. याप्रसंगी जिल्हा पोलीस उपाधीक्षक अमोल भारती, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, पोलीस निरीक्षक कोकरे, मुनगीर, बारवकर यांच्यासह ॲड. आरती पोखरणा, ॲड. योगिता कोकरे, ॲड. प्रदीप पठारे आदी उपस्थित होते.

ॲड. येवले म्हणाल्या की, पोलीस यंत्रणा म्हणजे खऱ्या अर्थाने समाजाचा तिसरा डोळा आहे. समाजातील दृष्ट प्रवृत्तींना अळा घालण्याचे काम पोलीस यंत्रणेतील कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांमुळे होत आहे. या प्रकरणात गीते यांचा तपास महत्त्वाचा ठरला. नुकतेच पुराच्या पाण्यात वाहून चाललेल्या नागरिकांचे जीव त्यांनी वाचवले. ते कर्तव्यदक्ष अधिकारी असले तरी, वर्दीमधील माणुसकी जपणारा अधिकारी असल्याचेही त्या म्हणाल्या.

# नेवासानगरी 'ज्ञानोबा तुकाराम'च्या जयघोषाने दुमदुमली

## यंदा प्रथमच २३ ते २७ दिंड्या एकत्रित पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान; पैस खांबाचा महाअभिषेक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी असलेल्या ज्ञानेश्वरी लिखाणस्थान नेवासा नगरीतून यंदा प्रथमच २३ ते २७ दिंड्यांचा एकत्रित ज्ञानेश्वरी पालखी सोहळ्याचे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाला. सोहळ्याच्या प्रारंभापासून नेवासा नगरी भक्तीरसात न्हालेली दिसून आली. पहाटे ज्ञानेश्वर देवस्थानचे देविदास महाराज मस्के, भीमाशंकर जाधव, आणि प्राची जाधव तसेच निंभारी गावचे सरपंच अण्णासाहेब जाधव व पांडुरंग पवार यांच्या हस्ते माऊली स्वरूप पैस खांबाला महाअभिषेक करण्यात आला.

दुपारी दोन वाजता संतश्रेष्ठ भास्करगिरी महाराज, एकनाथ महाराजांचे तेरावे वंशज डॉ. मेघशाम गोसावी, चौदावे वंशज ज्ञानराज गोसावी, त्यांचे सुपुत्र पंधरावे वंशज, गाथामूर्ती रामभाऊ राऊत, उद्धव महाराज नेवासेकर, श्रीराम महाराज झिंजुर्डे ,आमदार विठ्ठलराव लंघे, ज्ञानेश्वर संस्थांचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, माजी आ. बाळासाहेब मुरकुटे, माजी आ. नरेंद्र घुले, प्रभाकरराव शिंदे, भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या उपस्थितीत प्रस्थानाची महापूजा पार पडली

भर पावसात मस्तकी अष्टगंध टिळा हातात टाळ्या चिपळ्या आणि मृदुंग सह मुखाने ज्ञानोबा तुकाराम माऊली बरोबर विठ्ठलाचा जयघोष करीत पांढरा शुभ्र गणवेशातील वारकरीची भव्य मिरवणूकत हजारो भक्तांचे दर्शन आणि पहिलाच रिंगण सोहळा पाहिला.

महापूजनानंतर पावसातच नवीन बनवलेल्या भव्य पालखीत ज्ञानेश्वरीची प्रत, ज्ञानेश्वरांची पादुका आणि पैस खांबाच्या प्रतिकृतीसह ज्ञानेश्वरांची मूर्ती विराजमान करण्यात आली. पालखीच्या मिरवणुकीच्या अग्रभागी राऊत महाराजांची दिंडी, त्यानंतर संत ज्ञानेश्वर देवस्थानची दिंडी, मानाचे १० अश्व, भजनी मंडळ, बैलगाडीवरील नगारा पथक, बदामबाई हायस्कूलच्या मुलींचे लेझीम पथक, विठ्ठल-रुक्मिणीच्या जिवंत प्रतिकृतीचा देखावा, झेंडेकरी आणि टाळ-मृदुंग वादकांचे भजनी वारकरी होते.



### टाळ-मृदुंगाच्या गजरात अनोखे दृश्य

औदुंबर चौक मार्गे पालखी नेवासा बसस्थानकात आली आणि भव्य रिंगण सोहळा पार पडला. प्रथमच झालेल्या या रिंगणात पहिलाच पालखी सोहळा असल्याने पालखी खेळवणे, अश्वांचे नृत्य, अश्वंचे झेंडेकरी-टाळकरी यांचे रिंगण असे टाळ-मृदुंगाच्या गजरात अनोखे दृश्य पाहायला मिळाले. रिंगण पाहण्यासाठी नेवासा शहरासह पंचक्रोशीतील भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती.

### दिंड्यांचे स्वागत करून दिला महाप्रसाद

मारुतीराव घुले पतसंस्थेचे चेअरमन नंदकुमार पाटील यांनी स्वागत केले. मध्यमेश्वर नगरमधील नागरिकांनी देखील भव्य स्वागत केले. रात्री देविदास महाराज मस्के यांचे कीर्तननंतर नेवासा खुर्द आणि बुद्रुक तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी दिलेल्या आमटी भाकरीच्या सर्व वारकऱ्यांना अन्नदान करण्यात आले.

पालखीच्या मागे सुमारे १८ दिंड्या सहभागी झाल्या होत्या. या भव्य मिरवणुकीत १५ हजारांहून अधिक वारकरी भाविक सहभागी झाले. नंदकुमार खरात महाराज, नरहरी महाराज देवस्थान विश्वस्त मंडळ व तुकाराम महाराज देवस्थानचे उद्धव महाराज नेवास कर यांनी पालखीचे स्वागत केले.

# न्यायप्रक्रियेद्वारे विश्वस्त निवड करा

## कोरठण खंडोबा विश्वस्त निवडीसाठी विश्वस्तांची प्रशासनाकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्यस्तरीय ब वर्ग तीर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान पिंपळगाव रोठा या न्यासाचे रिक्त झालेल्या विश्वस्त पदावर विश्वस्त मंडळाने न्यायप्रक्रियेद्वारे, पारदर्शकपणे विश्वस्त निवड करावी अशी मागणी आता विश्वस्तांनी ही केली आहे.

निवेदन न्यासाचे विद्यमान विश्वस्त जालिंदर खोसे, महादेव पुंडे, धोंडीभाऊ जगताप, दिलीप घुले यांनी न्यासाचे अध्यक्ष व सचिव यांना पाठविले आहे.

न्यासाच्या उद्देशामध्ये सन २०१९ मध्ये वाढ करण्यात आली असून वैद्यकीय, पर्यावरण, चॅरिटेबल, सामाजिक, शैक्षणिक उद्देशांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्या कार्यासाठी तज्ञ, अनुभवी व्यक्तींची विश्वस्त पदावर निवड होणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर विश्वस्त पदाची जाहिरात वर्तमानपत्रातून देण्यात येऊन, अर्ज मागवून, अनुभवी निवड पॅनलकडून, मुलाखती घेऊन, गुणवत्ता, पात्रता, योग्यता यावर विश्वस्तांची निवड करण्यात यावी.

तसेच अर्जदारांना पोलीस व्हेरिफिकेशन आवश्यक करावे, असे पारदर्शक व न्यायप्रक्रियेचा अवलंब विश्वस्त मंडळाने करण्याची मागणी विश्वस्तांनी पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.




### ... तरच सर्वांना प्रक्रियेत येण्याची संधी मिळेल

स्व. राजेंद्र चौधरी यांचे निधनाने रिक्त झालेल्या जागेवर नवीन विश्वस्त निवड करण्यासाठी विश्वस्त मंडळाकडून पारदर्शक, न्यायप्रक्रियेद्वारे विश्वस्त निवड करावी. त्यामुळे न्यासाचे मानकरी, देणगीदार, भाविक भक्त, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रातील तज्ञ, अनुभवी अशा सर्वांना प्रक्रियेत येण्याची संधी उपलब्ध होईल, अशी मागणी विश्वस्तांनी केली आहे.

# 'एक पेड़ माँ के नाम'मध्ये डॉ. पाऊलबुधेंचा सहभाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शासनाच्या एक पेड़ माँ के नाम या मोहिमे अंतर्गत नारायण डोह येथील डॉ. ना. ज. पाऊलबुधे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेऊन आपल्या कुटुंबातील सदस्यांना करून घेतले. जो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पर्यावरण जागरूकता आणि संवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू केलेला देशव्यापी उपक्रम आहे. मातांच्या सन्मानार्थ झाडे लावण्याचे उद्दिष्ट असलेल्या या मोहिमेत त्यांच्या आईंसोबत रोपे लावणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग दिसून आला.



या कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे ग्रीन क्लबचे समन्वयक प्रा. आर. एन. देशपांडे आणि एनएसएस समन्वयक प्रा. सुदर्शन लोखंडे यांनी केले. कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व आणि सृष्टीचे रक्षण करण्यात व्यक्ती काय भूमिका बजावू शकतात यावर भर दिला.

या मोहिमेद्वारे, विद्यार्थ्यांना पर्यावरणीय संतुलन राखण्यात झाडांचे महत्त्व आणि मानवी कृतींचा पर्यावरणावर होणारा परिणाम याबद्दल माहिती मिळाली. त्यांच्या मातांना झाडे समर्पित करून, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाप्रती जबाबदारी आणि मालकीची भावना निर्माण झाली.

### पाऊलबुधेंकडून या उपक्रमाचे कौतुक

तंत्रनिकेतनाच्या विद्यार्थ्यांनी हिरवेगार आणि अधिक शाश्वत भविष्य निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. या उपक्रमाचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, सर्व संचालक मंडळ, शिक्षकवृंद आदिनी केले आहे.

### ...१०९ कोटींहून अधिक झाडे लावली

एक पेड माँ के नाम मोहिमेला देशभरात गती मिळाली आहे, आतापर्यंत १०९ कोटींहून अधिक झाडे लावण्यात आली आहेत. हा उपक्रम केवळ पर्यावरण संवर्धनाला प्रोत्साहन देत नाही तर समुदायाची भावना आणि निसर्गाशी भावनिक संबंध निर्माण करतो.

# ... चक्क ५१ गुंठे जमीन चोरीला?

## तहसील कार्यालयावर आंदोलन; तहसीलदारांकडून कुठलाही ठोस निर्णय नाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** चिचोंडी पाटील येथील गट नंबर १०२६ मधील कौसाबाई मारुती सरोदे यांच्या ५१ गुंठे जमीन चोरी प्रकरणी शेळ्या, मेंढ्या घेऊन सुरू असलेल्या तहसील कार्यालयातील आंदोलनाला आज तीन दिवस उलटून गेले, तरीही अहिल्यानगर तहसील महसूल प्रशासनाने कुठलीही कार्यवाही व आश्वासन दिलेले नाही.

याबाबत दि. १८ जून २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता सदर प्रकरण अहिल्यानगर तालुका तहसीलदार यांच्याकडून वर्ग होऊन ती अहिल्यानगर अप्पर तहसीलदार स्वप्निल ढवळे यांच्याकडे तातडीची सुनावणी घेण्यात आली. यामध्ये ज्यांनी १२ वर्षांपूर्वी तात्कालीन तलाठी सर्कल यांना हाताशी धरून जी ५१ गुंठे जमीन नावावर केलेली आहे. त्या व्यक्तींनी कुठलेही खरेदीखत, सुनावणी दरम्यान सादर न केल्याने सदर केस निकालावरती बंद करण्यात आली. या केस प्रकरणी लवकरच निकाल होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात येत आहे. महसूल खात्याचे तत्कालीन तलाठी सर्कल यांच्यावर परस्पर जमीन दुसऱ्याच्या नावावर करून दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल होत असल्याने सदर निकाल देण्यास महसूल प्रशासन करत आहे.

जिल्ह्यातील एक तोतया पीए या प्रकरणात जाणून-बुजून तहसील अधिकाऱ्यांना धमक्या देऊन सरोदे परिवारावर अन्याय करण्याची भूमिका घेत आहेत. यानिमित्ताने त्या आमदारांनी त्यांचा स्वीय सहाय्यक कोण आहेत. त्याचे नाव व नंबर जाहीर करावा, जेणेकरून सर्व जनतेला अधिकाऱ्यांना फोन आल्यानंतर समजेल व जोपर्यंत न्याय व निकाल देत नाही. तोपर्यंत शेळ्या, मेंढ्या, घर प्रपंच या अहिल्यानगर तहसील कार्यालयातून उचलणार नाही असा पवित्रा आंदोलकांनी घेतल्याने निकाल द्या. निकाल द्या, तहसीलदार निकाल द्या, या घोषणांनी सामाजिक कार्यकर्ते अरुण रोडे व सरोदे परिवार, कार्यकर्त्यांनी, आंदोलकांनी तहसील परिसर दणाणून सोडला होता.

> सदर प्रकरणात प्रतिवादी यांचे वकील यांनी पुन्हा न्यायदंडाधिकारी ढवळे साहेबांकडून दुसऱ्या तहसीलदारांकडे वर्ग करण्याची मागणी केली. सदर प्रकरणात राजकीय मोठा हस्तक्षेप होऊन आर्थिक देवाण-घेवाण झाल्याची शक्यता आहे.
>
> **– शरद पवार, सरपंच**

# पिण्याच्या पाण्यासाठी पंचायत समितीत उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** मोहोज बुद्रुक येथील पिण्याच्या पाण्याच्या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने पाथर्डी पंचायत समितीसमोर उपोषण करून आंदोलन करण्यात आले. प्रभारी गटविकास अधिकारी संगीता पालवे यांनी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुरेश शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाने गटविकास अधिकारी व समाज कल्याण अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की, मोहोज बुद्रुक गावात पिण्याचे व वापराचे पाणी अद्यापही उपलब्ध नाही. गावकरी




सात किलोमीटर अंतरावरील मिरी ग्रामपंचायतीच्या आरो मशीनवरून १० रुपये ठोकळा टाकून पिण्याचे पाणी आणतात. गावात चार-पाच वर्षांपूर्वी बसवलेली आरो मशीन कधीच चालू करण्यात आलेली नाही. दलित वस्तीतील विहिरीत पाणी आहे, परंतु ते खारट आहे आणि वापरासाठीही सोडले जात नाही. ग्रामपंचायतीने ही विहीर पाडली असून तिथे जागा घेतली आहे.जिल्हाध्यक्ष सुरेश शिरसाठ यांनी मागण्या मांडताना सांगितले की, गावातील आरो मशीन तातडीने चालू करावी, दलित वस्तीतील विहिरीवर जाळी बसवावी, आठवड्यातून एकदा पिण्याचे पाणी आणि दोनदा वापराचे पाणी सोडावे. यावेळी नाशिर शेख, शिवशंकर राजळे, जिल्हाध्यक्ष सुरेश शिरसाठ, सुधाकर शेरकर, भाऊसाहेब शेलार, पावलस पवार, लक्ष्मण पेटारे, सुनील उमाप, मल्हारी वाघमारे, तानाजी वाघमारे, केरू वाघमारे, हनुमान वाघमारे, लखन वाघमारे, मंदा शिरसाट, मनीषा शिरसाठ, दिपाली शिरसाट, शारदा शिरसाट, शकुंतला शिरसाट, अलका शेलार, मीरा शिरसाठ, मोनिका शिरसाठ, हौसाबाई शिरसाट आदी महिला व कार्यकर्ते उपस्थित होते.

# साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या उपाध्यक्षपदी निमसे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** डी. एम. निमसे हे नेवासा तालुक्यातील मुळा सहकारी साखर कारखाना युनियनचे सरचिटणीस म्हणून काम पाहत होते. नियोजित करण्यात आलेल्या सभेच्या कार्यस्थळी महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाची कार्यकारी मंडळ व वार्षिक जनरल कौन्सिल बैठक सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना, सोलापूर येथे पार पडली तेव्हा सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी तात्यासाहेब काळे हे होते. प्रारभी स्व. शंकरराव भोसले व इतर साखर कामगारांना उपाध्यक्ष युवराज रणवरे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. निवडीत सरचिटणीसपदी शंकरराव भोसले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदावर कोल्हापूरचे राऊ शंकर पाटील यांची निवड झाली.

या कार्यक्रमास सिद्धेश्वर कारखान्याचे कार्यकारी संचालक सलगर, अविनाश आपटे, युवराज रणवरे, प्रदीप शिंदे, राजेंद्र तावरे, संजय पाटील, सयाजी कदम, सहजिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी ज्ञानदेव पाटील (प्रवरा), सचिन कोकाटे (राजाराम कारखाना), विजय पाटील (पांडुरंग कारखाना), अशोकराव अरगडे (ज्ञानेश्वर कारखाना) यांची भाषणे झाली. सूत्रसंचालन चंद्रशेखर कलगे यांनी केले. तर आभार विजय पाटील यांनी मानले.

# नागरिकांची शंभर वर्षांची प्रतीक्षा संपली; नागरिकांकडून जल्लोषात स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** तालुक्यातील शिंदेवाडी कर्जत ते जुना टाकळी खंडेश्वरी हा रस्ता खुला करण्यात यावा यासाठी शिंदेवाडी या गावातील व त्या परिसरातील नागरिकांचा तब्बल १०० वर्षांपासून संघर्ष सुरू होता, तो आज अखेर संपला.

नागरिकांना येण्या-जाण्यासाठी हा रस्ता खुला झाला आहे. परिसरातील नागरिकांनी मोठ्या जल्लोषामध्ये याचे स्वागत केले.यासाठी नगरसेवक प्राध्यापक सतीश पाटील व माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण घुले यांनी पुढाकार घेतला होता. त्यामुळे खऱ्या अर्थाने हा रस्त्याचा प्रश्न सुटला आहे. या रस्त्यामुळे सहा गावातील नागरिकांना याचा फायदा होणार आहे.

याबाबत घडलेली घटना अशी की, कर्जत तालुक्यामधील शिंदेवाडी कर्जत ते जुना टाकळी खंडेश्वरी हा रस्ता शेतकऱ्यांनी नागरिकांनी अतिक्रमण करून अडवला होता. गट नंबर चौदाशे चार, गट नंबर चौदाशे दोन व गट नंबर चौदाशे तीन यातून रस्ता नागरिकांना जाण्या येण्यासाठी मिळत नव्हता. हा रस्ता खुला करण्यासाठी १०० वर्षांपासून परिसरातील नागरिकांचा संघर्ष सुरू होता. प्रशासनाकडे मागणी करण्यात येत होती.

> रस्त्यासाठी न्यायालयामध्ये देखील हक्कासाठी संघर्ष सुरू होता. मात्र यश येत नव्हता. मात्र नगरसेवक सतीश पाटील यांनी या रस्त्यासाठी पुढाकार घेतला. त्यांनी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण घुले यांना या रस्त्याची सर्व माहिती सांगितली. यानंतर तात्काळ घुले यांनी या परिसरातील नागरिकांची बैठक घेऊन त्यांच्यामध्ये असलेले वाद मिटवणे, याबाबत माहिती दिली.

या रस्त्यांसाठी असलेला अनेक पिढ्यांचा संघर्ष आहे संपला व गट नंबर चौदाशे चार, गट नंबर चौदाशे दोन व गट नंबर चौदाशे तीन यातून यामधून बारा फुटाचा रस्ता देण्याचे ठरले व सर्व लगतच्या शेतकऱ्यांनी हा निर्णय मान्य केला व लगेचच जेसीबी मशीनच्या साह्याने शिंदेवाडी ते जुना टाकळी खंडेश्वरी रस्ता हा खुला करण्यात आला व सर्व परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला.



अतिशय अशक्यप्राय रस्ता खुला केल्यामुळे प्रवीण घुले यांचे आभार मानले. शिंदेवाडी व परिसरातील ग्रामस्थांनी त्यांचा फेटा बांधून सत्कार केला. या रस्त्यासाठी नगरसेवक प्राध्यापक सतीश पाटील यांची सुद्धा फार मोठे योगदान होते. यावेळी कर्जत येथील कामगार तलाठी प्रशांत जमदाडे, सर्कल धुळाजी केसकर, कामगार तलाठी महेश शिंदे, ऋषिकेश पाटील, माजी सरपंच चंद्रकांत तोरडमल, बापूसाहेब तोरडमल, माजी उपसरपंच निकेश तोरडमल, सागर नलावडे, सुरेश शिरसागर आदी उपस्थित होते.

# नागरी समस्यांबाबत नेत्यांची गुपचिळी

## कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, नाल्यांची सफाई, शिक्षण क्षेत्राकडे दुर्लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शहर व तालुक्यातील नागरिक विविध नागरी व प्रशासकीय समस्यांनी त्रस्त असून, या सर्व प्रश्नांना शासनदरबारी प्रभावीपणे मांडून त्यावर ठोस कार्यवाही करण्यासाठी आवश्यक असणारे खरेखुरे लोकप्रतिनिधित्व व राजकीय नेतृत्व पूर्णपणे अनुपस्थित असल्याची खंत सामान्य जनतेतून प्रकर्षाने व्यक्त होत आहे.

शहरातील रस्ते, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, नाल्यांची सफाई, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील त्रुटींच्या बरोबरीने आता तहसील कार्यालयातील रखडलेली प्रकरणे, शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या अडचणी, बेरोजगार युवकांसाठी रोजगार उपलब्धतेच्या संधींचा अभाव, तसेच नगर भूमापन कार्यालयातील फेरफार, मोजणी, सातबारा उताऱ्यांसारखी शासकीय कामे अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याने नागरिक हतबल झाले आहेत.

तहसील कार्यालयात उत्पन्न व जात प्रमाणपत्र, वारस हक्क, निवासी दाखले आदी अत्यावश्यक कामांसाठी नागरिकांना अनेक दिवस हेलपाटे घालावे लागत असून, कर्मचाऱ्यांची कमतरता, तांत्रिक अडचणी, आणि काही ठिकाणी निष्क्रियतेमुळे नागरिकांची वेळ, श्रम आणि पैसा वाया जात आहे. शिक्षणाच्या बाबतीत विद्यार्थ्यांना वेळेत आवश्यक कागदपत्रे मिळत नसल्यामुळे प्रवेश प्रक्रिया अडथळ्यात येत आहे. अनेक विद्यार्थी पात्र असूनही वेळेत दाखले मिळत नसल्यामुळे उच्च शिक्षणाचे संधी हुकत आहेत.



दुसरीकडे बेरोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, शहरातील शिक्षित तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी मिळत नाहीत. कौशल्य विकास प्रशिक्षण, उद्योजकता मार्गदर्शन, व शासकीय योजनांची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे युवक भरकटत आहेत. प्रशासनाकडून अशा योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याने राजकीय नेतृत्वाकडून दबाव टाकून त्या राबवण्याची अपेक्षा होती, ती पूर्ण होताना दिसत नाही.

नगर भूमापन कार्यालयातील कामे जसे की जमिनीचे फेरफार, मोजणी, म्युटेशन, जमीन सीमांकन इत्यादी यामध्येही प्रचंड विलंब होत असून अनेक शेतकरी, व्यावसायिक, आणि सामान्य नागरिक ताटकळलेले आहेत. काही जणांनी महिनोंमहिने कार्यालयाच्या फेऱ्या मारूनही काम मार्गी लागलेले नाही, अशी तक्रार आहे.

### नागरिकांना असा नेता हवाय

''आम्हाला असा नेता हवा जो फक्त भाषणं करणार नाही, तर तहसील, भूमापन, शिक्षण, आरोग्य, रोजगार यांसारख्या प्रत्येक विभागात शिरून अधिकाऱ्यांना जाब विचारेल आणि वेळेत काम करवून घेईल,'' अशी भावना श्रीरामपूरच्या युवकांनी व्यक्त केली आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या हक्काच्या सेवांसाठी आता निष्क्रिय नेतृत्व नव्हे, तर अभ्यासू, सक्रिय, निर्भीड आणि खऱ्या अर्थाने लोकसेवक असलेले नेतृत्व उदयास येणे अत्यावश्यक बनले आहे. श्रीरामपूरकरांची एकमुखी मागणी आहे ''नेतेपणा हौसेसाठी नव्हे, तर जनतेच्या प्रश्नांवर झटण्यासाठी हवा!''.

---

# 'ना. विखेंचे शैक्षणिक कार्य कौतुकास्पद'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** महाराष्ट्र राज्याचे जलसंधारण मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विविध पदावरून शैक्षणिक कार्य करताना आधुनिकतेची कास धरली, असे मत कोल्हार येथील उद्योजक डॉ. श्रीकांत बेंद्रे यांनी व्यक्त केले.



प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालय, लोणी येथे आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, शिक्षण मंत्री असताना डॉ. विखे पाटील यांनी सेवापूर्व आणि सेवांतर्गत प्रशिक्षण, व्यावसायिक आणि कौशल्यपूर्ण शिक्षण यावर विशेष भर दिला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू केले. महसूल मंत्री असताना विद्यार्थ्यांना जे विविध शैक्षणिक कागदपत्रे लागतात ते शाळा महविद्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. विखे पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन भोसले यांनी केले, तर आभार प्रा. नयना औताडे यांनी मानले.

डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालयात श्रमदान, वृक्षारोपण हे उपक्रम राबविल्याची माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन भोसले यांनी दिली. या उपक्रमासाठी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

# सोमवारी वाकडी ते पंढरपूर पायी दिंडीचे प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** येथील श्रीक्षेत्र खंडोबाची वाकडी ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे सोमवारी (दि. २३) जून रोजी प्रस्थान होणार आहे. या दिंडी सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. यंदा वेळेवर व समाधानकारक पाऊस पडल्याने वारकरी असलेल्या शेतकऱ्यांची शेती मशागत व पेरणीची तयारी सुरु आहे. त्यामुळे अतिशय उत्साहात सर्वच पायी दिंडी सोहळ्यांत वारकऱ्यांची संख्या वाढताना दिसत आहे.

राहाता तालुक्यातील वाकडी येथील श्री खंडेराय देवस्थान, जय मल्हार पायी दिंडी सोहळ्याचे यंदाचे १८ वे वर्ष आहे. या दिंडी सोहळ्याचे सोमवारी (दि.सांगता होणार आहे. खंडोबाची व पांडुरंगाची आरती झाल्यावर टाळ मृदूंगाच्या गजरात वाजत गाजत वाकडी येथून पायी दिंडी मार्गस्थ होणार आहे.

# कृष्णावंती नदीवरील वाकी तलाव ओव्हर फ्लो

## धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** भंडारदरा पावसाचा जोर वाढल्याने प्रवरा नदीची उपनदी कृष्णावंती नदीवरील ११२ दलघफू क्षमतेचे वाकी जलाशय पूर्ण क्षमतेने भरले. निळवंडे धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील या जलाशयातून ओव्हर फ्लोचे पाणी प्रवरा नदीपात्रातून ओसंडून वाहू लागले. यामुळे यापुढील काळात निळवंडे धरण जलदगतीने भरण्यास मदत होईल पाणीसाठेत झपाट्याने वाढ होत आहे.



अकोले तालुक्यातील प्रवरा व मुळा नदी खोऱ्यांच्या उगमापासून ओढे, नाले, दुथडी भरून वाहत आहेत. सह्याद्रीच्या डोंगररांगा धबधब्यांनी सजल्या. सर्वप्रथम मुळा नदीवरील १९३ दलघफू क्षमतेचा अंबित लघुपाटबंधारे प्रकल्प तुडुंब भरला. त्यानंतर कोतूळ जवळील ६०० दलघफू क्षमतेचा पिंपळगाव खांड प्रकल्प ओव्हरफ्लो झाला.

ओव्हरफ्लोचे हे पाणी मुळा नदीतून राहुरीतील ज्ञानेश्वर सागर धरणाकडे झेपावले. निळवंडे धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील प्रवरा नदीची उपनदी असलेल्या कृष्णावती नदीवरील ११२ दलघफू क्षमतेचा वाकी तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे ओव्हरफ्लो झाला. भंडारदऱ्याचा पाणीसाठा ३९९४ दलघफूटवर पोहचला. तर निळवंडे धरणाचा २८६३ द.ल.घ.फू पोहोचल आहे.

---

# अन्नदान सेवेला एक लाखांची देणगी; आमदार जगताप यांच्यासाठी केला होता नवस

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आमदार संग्राम जगताप आमदार व्हावेत म्हणून नगर मधील गणेश दातरंगे यांनी अक्कलकोटच्या स्वामी समर्थांना साकडे घातले होते अन्नदानाचा नवस केला होता. त्या नवसाची पूर्ती गुरुवारी करण्यात आली.



अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिर ट्रस्टच्या अन्नदान सेवा केंद्रात एक लाख रुपयांची देणगी देऊन गणेश दातरंगे यांनी नवस पुर्ण केला. आ. संग्राम जगतापा यांचा स्वभाव, राजकारणाची पध्दत आणि त्यांचा साधेपणा हा अगदी लहान मुलांपासून अबालवृध्दांपर्यंत सर्वांनाच भावतो. साधारणपणे महापौर असल्यापासून ते आजतागायतपणे त्यांनी सामान्य माणसाची नाळ तूटू दिली नाही. केवळ राजकारणासाठी राजकारण न करता प्रत्येकाच्या सुख-दुःखात आ. जगताप धावून जात असल्याने त्यांचे नगर शहरातील प्रत्येक कुटूंबाशी आपुलकीचे नाते निर्माण झाले आहे.२०२५ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान आ. संग्राम जगताप हे महायुतीच्या बरोबर होते. लोकसभेनंतर महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे वारे जोरात होते. ही निवडणूक फार चुरशीची होईल असे वाटत असताना सामान्य कार्यकर्ता आणि शहरातील प्रत्येक भागातील गोरगरिब जनता मात्र जगताप यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभी होती.

# साईबाबा पालखीचे आज पंढरपूरकडे प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** साईबाबा संस्थानच्या सहकार्याने व साईबाबा पालखी सोहळा समिती शिर्डी यांच्या वतीने शिर्डी व पंचक्रोशीतील भाविकांच्या सहभागाने महामंडलेश्वर स्वामी काशीकानंद महाराज परमहंस यांच्या मार्गदर्शनाने श्रीक्षेत्र शिर्डी ते श्रीक्षेत्र पंढरपूर साईबाबा पालखी पायी दिंडी सोहळ्याचे आज शनिवार दि. २१ जून रोजी दुपारी १ वाजता साई शताब्दी मंडप साईबाबा मंदिर येथून प्रस्थान होणार आहे.पालखी सोहळा राहाता येथे मुक्कामी राहील. २२ जून रोजी पालखी सोहळा पुढील वाटचाल करत कोल्हार येथे मुक्काम, २३ जून राहूरी, २४ जून विळदघाट, २५ जून अहिल्यानगर, २६ जून रुईछत्तीशी, २७ जून मिरजगाव, २८ जून निमगाव धाकू, २९ जून करमाळा, ३० जून जेऊर, १ जुलै टेंभुर्णी, २ जुलै नरसिंहपूर, ३ जुलै जांबुड, ४ जुलै बंडी शेगाव, ५ जुलै पंढरपूर येथे मुक्कामी थांबणार आहे. या सोहळ्याची सांगता ७ जुलै रोजी पंढरपूर येथे काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.पायी दिंडी सोहळ्याच्या प्रस्थान समयी भाविकांनी साई शताब्दी मंदिर येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. तसेच या सोहळ्यामध्ये शिर्डीसह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या साईसेवेचा व भक्तीचा आनंद घ्यावा, असे आवाहन साईबाबा पालखी सोहळ्याचे अध्यक्ष श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी काशिकानंद महाराज परमहंस यांनी केले आहे



# सहकार टिकवणे ही काळाची गरज

## कोल्हे; जेऊर कुंभारी सोसायटीचा नामांतर सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** सहकार टिकवणे ही काळाची गरज आहे. संस्था सुरू करणे सोपे असले तरी ती यशस्वीरित्या चालवणे आणि टिकवणे हे अधिक कठीण आणि जबाबदारीचे काम असते. व्यवस्थापनावर सतत लक्ष ठेवणे गरजेचे असते, अन्यथा अनेक संस्था दुर्लक्षामुळे मोडकळीस येतात. ग्रामीण भागात अशा संस्था हा अर्थकारणाचा दुवा आहेत आणि त्या टिकवण्यासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजी आ. बिपीन कोल्हे यांनी केले.

जेऊर कुंभारी (ता. कोपरगाव) येथील जेऊर कुंभारी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थेच्या नव्या वास्तूचा नूतन नामकरण समारंभ सोहळा संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ते बोलत होते. संस्थेच्या नव्या इमारतीला 'यादवराव शिवराम वक्ते जेऊर कुंभारी विविध सेवा सहकारी संस्था मर्यादित जेऊर कुंभारी ता. कोपरगाव' असे गौरवपूर्ण नाव देण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात गणेश मंदिरात नारळ वाढवून झाली. त्यानंतर नामफलकाचे उद्घाटन, सत्कार समारंभ अशा विविध टप्प्यांमध्ये कार्यक्रम पार पडला.



### कार्यक्रमास यांची होती उपस्थिती

या प्रसंगी सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना व्हाईस चेअरमन राजेंद्रजी कोळपे, संचालक विश्वासराव महाले, संचालक बाळासाहेब वक्ते, संचालक ज्ञानेश्वर होन, अरुणराव येवले, संजय होन, संचालक सतीशराव आव्हाड, संभाजीराव गावंड, विजयराव रोहम, शिवाजीराव वक्ते, दीपकराव गायकवाड उपस्थित होते. आभार शिवराजीराव वक्ते यांनी मानले.

# लोणीत ७०० किलो गोमांस पकडले



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** राहाता तालुक्यातील ममदापूर येथे पोलिसांना छापा घालून सुमारे १ लाख ४० हजारांचे ७०० किलो गोमांस पोलिसांनी पकडले. याप्रकरणी ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शोपेब यासीन कुरेशी, अब्दुल रहेमान यासीन शेख, अब्दुल करीम कुरेशी, मुनीर आमीर कुरेशी, शाकीब रज्जाक कुरेशी, साजीद मुनीस कुरेशी, बकर उर्फ गोट्या राजु शेख सर्व (रा. कुरेशी मोहल्ला ममदापुर ता. राहाता, जिल्हा अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, लोणी पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की ममदापूर येथे कुरेशी मोहल्ल्यातील शोयेब यासीन शेख याचे राहते घराचे पाठीमागील बाजूस हिरव्या रंगाचे पत्र्याचे शेडमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल होत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकला असता या ठिकाणी गोमांसाची कत्तल सुरू असल्याचे आढळून आले. पोलिसांनी या ठिकाणाहून ७०० किलो गोमांस जप्त केले आहे.

---


# एकाच खोलीत तरुण-तरुणीने आयुष्य संपविले

## चिठ्ठीत लिहिले 'आम्ही बहीण-भाऊ'; पोलिसांचा बारकाईने तपास सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोलापूर :** शहरातील एका उच्चभ्रू सोसायटीत गुरुवारी सायंकाळी एक धक्कादायक घटना उघडकीस आली. एका सोसायटीच्या दुसऱ्या मजल्यावर तरुण आणि तरुणीने एकाच दोरीला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे समोर आले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, दोघांच्या मृत्यूमागील कारणांचा शोध घेण्यासाठी एमआयडीसी पोलीस तपास करत आहेत. विशेष म्हणजे, घटनास्थळी सापडलेल्या चिठ्ठीमुळे या प्रकरणाचे गूढ अधिकच वाढले आहे.

मृत तरुणाचे नाव रोहित भिमु ठणकेदार (वय २१, रा. मड्डी वस्ती, सोलापूर) आणि मृत तरुणीचे नाव अश्विनी विरेश केसापुरे (वय २३, रा. शाहीर वस्ती, सोलापूर) असे आहे. दोघेही एकाच दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. या घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये हादरून सोडले असून, दोघांनी अशा टोकाच्या निर्णय का घेतला, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.रोहित ठणकेदार हा अविवाहित तरुण असून तो ट्रक चालक म्हणून काम करत होता. दुसरीकडे, अश्विनी केसापुरे ही सोलापूर येथे उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करून कर्नाटकातील बागलकोट येथील डी फार्मसी कॉलेजमध्ये शिक्षण घेत होती. सुट्ट्यांमध्ये ती अधूनमधून सोलापुरात येत असे. नातेवाइकांच्या माहितीनुसार, रोहित आणि अश्विनी यांच्यात गेल्या काही काळापासून संपर्क होता. अश्विनीच्या घरी रोहित काही वेळा भेटण्यासाठी आला होता. दोघांनीही आपल्या नात्याबाबत विचारणा करणाऱ्यांना 'मानलेले भाऊ-बहीण' असे सांगितले होते.




### चिठ्ठीने वाढवले गूढ

पोलिसांना घटनास्थळी एक चिठ्ठी सापडली, ज्यामध्ये दोघांनी स्वतःला भाऊ-बहीण असल्याचा उल्लेख केला आहे. चिठ्ठीत लिहिले आहे, ''आम्ही भाऊ-बहीण आहोत. आमच्यावर कोणताही विनाकारण संशय घेऊ नये. आमच्या आत्महत्येला आमचे आई-वडील जबाबदार नाहीत.'' या चिठ्ठीमुळे दोघांचे नाते आणि आत्महत्येमागील कारण याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. स्थानिकांमध्ये दोघांमध्ये प्रेमसंबंध असावेत आणि त्यातूनच त्यांनी हा निर्णय घेतला असावा, अशी चर्चा सुरू होती. मात्र, चिठ्ठीतील मजकूरामुळे पोलिसांसमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.




## एकटेपणा कसा घालवू?

मी ३० वर्षांचा तरूण आहे. गेल्या १८ महिन्यांपासून कुवेतमध्ये नोकरी करतोय. आसपास अनेक लोक असले तरी खूप एकटं वाटतं. घरची आठवण येते. लवकरच माझं लग्न होणार आहे. एकटेपणाच्या भावनेमुळे माझ्या नात्यावर परिणाम होत आहे. मी बरेचदा संशय घेतो. मला खूप लवकर राग येतो. होणाऱ्या बायकोवर खूप प्रेम आहे. तिच्याशी सतत बोलत राहावं असं वाटतं. पण हे शक्य नाही हेही जाणतो. मी तिला स्पेस देत नाही असं वाटतं. याबद्दल अपराधीही वाटतं. मी काय करायला हवं? या मनस्थितीतून कसा बाहेर पडू? मला कोणतंही नातं गमवायचं नाही.



विचारा प्रश्न

**उत्तर :** एकटेपणाने अनेकांच्या आयुष्यात समस्या निर्माण होतात. ताणाच्या काळात मनात संशय निर्माण होतो. असुरक्षिततेची भावना दाटून येते. लग्नात एकमेकांवर विश्वास हवा. एकमेकांप्रती आदर हवा. जबाबदारी, काळजी हवी. स्वत:चा एकटेपणा घालवण्यासाठी आवडत्या गोष्टींसाठी वेळ द्या. छंद जोपासा. स्वत:चं वर्तुळ तयारा. कुटुंब आणि मित्रांसोबत नातं जपा. चांगलं साहित्य वाचा. नियमित व्यायाम करा. कामात व्यग्र राहा. ताण घेऊ नका.

## 'सोशल मीडिया'मुळे तरुणांमध्ये तणाव

आजच्या डिजिटल युगात 'सोशल मीडिया' हा जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. तरुण पिढीचा त्यात तासनतास वाया जात आहे. अभ्यासातून असे दिसून आले आहे, की 'सोशल मीडिया' हे तरुणांमध्ये तणावाचे प्रमुख कारण बनू शकते. लोक सोशल मीडियावर वेळ घालवतात, तेव्हा ते त्यांच्या काम, अभ्यास, मैत्री आणि कौटुंबिक नातेसंबंध यांसारख्या इतर क्रियाकलापांपासून दूर जातात. ही परिस्थिती त्यांना एकाकी बनवते आणि ते मानसिक तणावाचे बळी ठरतात. तरुण स्वतःची तुलना इतरांशी करू लागतात. त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंड आणि तणाव निर्माण होतो. युवा पिढी रात्री उशिरापर्यंत स्मार्टफोनचा वापर करते. त्यामुळे त्यांची दिनचर्या विस्कळीत होते. रात्री उशिरा झोपल्याने पुरेशी झोप मिळत नाही. त्यामुळे चिडचिड होते. रात्री उशिरापर्यंत फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपसारख्या 'सोशल मीडिया'चा वापर केल्याने डोळ्यांमध्ये झोपेसाठी जबाबदार असलेल्या मेलोटोनियम हार्मोनचे उत्सर्जन थांबते.

चर्चेत

'सोशल मीडिया'मुळे आपल्याला सतत काहीतरी चुकत असल्याची जाणीव होत असते. 'फोमो' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भीतीमुळे मानसिक तणाव आणि चिंता निर्माण होऊ शकते. अनेक वेळा तरुणांना 'सोशल मीडिया'वर ऑनलाइन छळवणूक आणि धमक्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांच्यात मानसिक तणाव निर्माण होतो.


आजकाल 'सोशल मीडिया'वर अश्लीलता आणि असभ्यता सामान्य मानली जाते. त्यामुळे तरुणांचा वास्तविक जगाशी संपर्क तुटतो आणि त्यांना सामाजिक एकटेपणा जाणवतो. त्यामुळे तणाव वाढतो. एका दिवसात किंवा आठवड्यात 'सोशल मीडिया'वर किती वेळ घालवायचा आहे ते ठरवा आणि त्याप्रमाणे वागा. कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवा. लोक 'सोशल मीडिया'वर त्यांचे आयुष्य सर्वोत्तम आहे, असे दाखवतात. त्यामुळे इतरांशी स्वतःची तुलना करणे टाळा. तुम्हाला त्रास देणाऱ्या बातम्या आणि पोस्ट टाळा.




**डॉ. प्रसन्न नेने**

## क्लासच्या दडपणामुळे मुले मानसिक विकाराची बळी

आजकाल बदलत्या काळानुसार शिक्षणाचे स्वरूपही बदलत चालले आहे. अनेक पालक आपल्या मुलांना लहान वयातच खूप साऱ्या ट्यूशन, 'ग्रुमिंग क्लासेस'ला पाठवतात. त्याचा काही मुलांवर तणाव येतो. मुलांबाबत पालकांनाही अनेक प्रकारचे तणाव असतात. यामध्ये त्यांना चांगले शिक्षण देण्यापासून त्यांना चांगल्या सवयी लावण्यापर्यंत अनेक गोष्टींचा समावेश आहे; परंतु या प्रक्रियेत अनेक वेळा काही पालक लक्ष देत नाहीत किंबहुना देऊ शकत नाही. यामुळे मुलांवर एक वेगळाच दबाव निर्माण होतो. त्यामुळे मुले अनेक प्रकारच्या मानसिक विकारांना बळी पडू शकतात.



बदलत्या काळामुळे लोकांची विचारसरणी, जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींमध्येही झालेला बदल दिसून येतो; मात्र या बदलामध्ये इतरही अनेक गोष्टींचा समावेश आहे, त्यातील एक म्हणजे शिक्षण व्यवस्था. वाचन आणि लेखनाचा चांगल्या भविष्याशी थेट संबंध आहे; पण यामुळे मुलांवर सुरुवातीपासूनच वेगळ्या प्रकारचे दडपण असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लहान वयातच मुलांमधील वाढत्या मानसिक समस्या हा चिंतेचा विषय आहे. बाहेर चाललेली स्पर्धा पाहता विद्यार्थ्यांवर चांगल्या कामगिरीचे वेगळेच दडपण असते. यामुळे त्यांना राग येतो, ती आक्रमक होतात आणि कधी कधी त्यांना आत्मविश्वास कमी वाटू शकतो. त्यामुळे डोकेदुखी, पोटदुखी, निद्रानाश यांसारखी लक्षणेही जाणवू शकतात.

काळजी घ्यावी

काही प्रकरणांमध्ये, या मानसिक समस्या स्वतःला हानी पोहोचवण्याचे कारण बनू शकतात. मूल नेहमी रागावत असेल, लोकांशी पूर्वीपेक्षा कमी संवाद साधत असेल, त्याच्या आहाराकडे लक्ष देत नसेल आणि त्याच्या झोपेच्या पद्धतीत बदल होत असेल तर ही तणाव आणि नैराश्याची लक्षणे आहेत. त्याची वेळीच ओळख करून घेतल्यास त्याला गंभीर परिस्थितीपर्यंत पोहोचण्यापासून रोखू शकतो. वाचन आणि लेखन महत्त्वाचे आहे; परंतु मुलांवर इतका दबाव टाकू नका की ते लहानपणीही तणावाला बळी पडतील. अभ्यासासोबतच घर, शाळा, कोचिंग या सर्व ठिकाणी मुले त्यांच्या समस्यांवर मोकळेपणाने चर्चा करू शकतील, असे वातावरण तयार करा. मुलांना हे स्वातंत्र्य देऊन त्यांना तणाव आणि नैराश्याला बळी पडण्यापासून वाचवू शकता. तसेच त्यांना समजावून सांगा, की शारीरिकदृष्ट्या निरोगी असण्याइतकेच मानसिकदृष्ट्या निरोगी असणेदेखील महत्त्वाचे आहे. यासाठी एखाद्या तज्ज्ञाची मदत घेण्यास अजिबात संकोच करू नका.

**डॉ. अनिल गुंजाळ**


## गर्भाशयाच्या विकाराने चार कोटी महिला त्रस्त

अलीकडेच बॉलिवूड अभिनेत्री शमिता शेट्टीवर 'एंडोमेट्रिओसिस'ची शस्त्रक्रिया झाली. शमिताने स्वत: तिच्या 'सोशल मीडिया' अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर करून लोकांना गर्भाशयाच्या या आजाराबाबत सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला. देशात सुमारे चार कोटी वीस लाख स्त्रिया 'एंडोमेट्रिओसिस रोगाने ग्रस्त आहेत; परंतु त्यांना हा रोग वेळेवर ओळखता येत नाही. कारण ते सामान्य वेदना, रक्तस्राव किंवा पेटके म्हणून दुर्लक्ष करतात. नंतर'एंडोमेट्रिओसिस'ची समस्या उद्भवू शकते. 'एंडोमेट्रिओसिस' हा महिलांच्या गर्भाशयाशी संबंधित आजार आहे. वास्तविक, गर्भाशयाच्या अस्तराला 'एंडोमेट्रियम' म्हणतात. मासिक पाळीच्या दरम्यान महिलांच्या शरीरातून एंडोमेट्रियम बाहेर पडतो; परंतु हे एंडोमेट्रियम अंडाशय, आतडे आणि श्रोणि पोकळीसारख्या ठिकाणी वाढतो. त्यामुळे आतमध्ये रक्तस्राव होतो. रक्तस्राव ट्यूबमध्येच जमा झाल्यामुळे गर्भाशयाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात आणि गर्भधारणेदरम्यान महिलांना समस्यांना सामोरे जावे लागते. 'एंडोमेट्रिओसिस'मध्ये ओटीपोटाच्या वेदना, मासिक पाळी किंवा ओव्हुलेशन दरम्यान असह्य वेदना, लैंगिक संभोग करताना सौम्य किंवा तीव्र वेदना, लघवीला त्रास, मासिक पाळी दरम्यान जोरदार रक्तस्राव अशा लक्षणाचा समावेश आहे.



व्याधीवेध

'एंडोमेट्रिओसिस'ने पीडित महिलांना सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवतो. यावर हार्मोनल थेरपी खूप प्रभावी आहे. याशिवाय, 'एंडोमेट्रिओसिस'ची स्थिती वाढल्यास लॅपरोस्कोपी शस्त्रक्रियेद्वारेदेखील तो बरा होऊ शकतो. महिलांनी निरोगी जीवनशैली जगली पाहिजे. त्यात संतुलित आहार, व्यायाम, तणावमुक्त जीवनशैलीचा अवलंब केला पाहिजे, जेणेकरून त्या 'एंडोमेट्रिओसिस'पासून स्वतःचा बचाव करू शकतील. बहुतेक महिलांना या आजाराबद्दल माहिती नसते. ही अनास्था टाळायला हवी.



## चिकन खाण्यामुळे प्रतिकारशक्ती होते कमी

सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट' (सीएई)च्या प्रयोगशाळेतील संशोधनात असे आढळून आले आहे, की चिकनमध्ये ४० टक्के प्रतिजैविकांचे अवशेष असतात. चिकनमध्ये प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात असे मानले जाते; परंतु अलीकडील काही संशोधनात असेही समोर आले आहे, की चिकन खाणाऱ्यांची प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते. त्यांच्यावर प्रतिजैविकांचाचा प्रभाव खूपच कमी होऊ शकतो.

जाणून घ्या

कोंबड्यांना वेगवेगळ्या रोगांपासून वाचवण्यासाठी किंवा त्यांना लवकर मोठे करण्यासाठी तसेच त्यांचे वजन वाढवण्यासाठी अँटीबायोटिक दिले जाते. मात्र चिकनमधील अँटिबायोटिक्स शरीरात जातात. त्यानंतर त्याची आपल्या शरीराला सवय होते. पण एखादी व्यक्ती आजारी पडते, तेव्हा त्याच्यावर अँटीबायोटिक्स लवकर काम करत नाहीत, त्यासाठी मग त्यांना जास्त डोस दिले जातात. ते शरीरासाठी हानिकारक असू शकतात.



**डॉ. सतीश सोनवणे**

## दुष्परिणाम उंच टाचेच्या चपलांचे

सणवार असो किंवा लग्नसमारंभ किंवा एखादी मिटिंग, महिला उंच टाचेच्या चपलांना प्राधान्य देतात. एखादी तरी उंच टाचेची चप्पल महिलांकडे असते. उंच टाचेच्या चपलांमुळे व्यक्तिमत्त्व खुलत असलं तरी त्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. हे दुष्परिणाम जाणून घेतले तर उंच टाचेच्या चप्पल घालायचा मोह तुम्ही नक्की टाळाल.



✻ उंच टाचेच्या चप्पल घातल्यानंतर आपण ताठ चालतो. यामुळे पायांची हालचाल नैसर्गिक पद्धतीने होत नाही. यामुळे सगळा भार गुडघ्यांवर येतो. गुडघेदुखी सुरू होते आणि भविष्यात ऑस्टिओआर्थ्रायटिसचा धोका उद्भवतो.

✻ उंच टाचेच्या चपलांमुळे पाठीचं दुखणं मागे लागू शकतं. अशा चपलांमुळे शरीराचं समतोल साधला जात नाही आणि पाठीचा खालचा भाग दुखू लागतो.

✻ दिवसभर उंच टाचेच्या चप्पल घालून फिरल्यानंतर पावलं आणि टाचा दुखू लागतात.

✻ चपलांच्या आकाराचा रक्ताभिसरणाशी जवळचा संबंध असतो. चपलांच्या आकारामुळे नसांना होणाऱ्या रक्तपुरवठ्यात अडथळे येऊ शकतात. यामुळे डोकेदुखीची समस्या निर्माण होऊ शकते.

✻ आपल्या पावलांचा आकार सर्वसाधारणपणे लांबुळका चौकोनी असतो. दुसरीकडे उंच टाचेच्या चपला निमुळत्या आणि रुंद असतात. यामुळे नखांची वाढ खुंटू शकते. चपलांच्या निमुळत्या आकारामुळे पायांच्या बोटांवर खूप ताण येतो आणि नखं आतल्या भागातच वाढतात.

आपण कुठे चुकतो?

✻ उंच टाचेच्या चप्पल घालण्याची वेळ आली तर पॅडचा वापर करा. यामुळे पायांवरचा ताण कमी होईल.

## कारणं पाठीच्या दुखण्यांची

प्रत्येकालाच कधी ना कधी पाठीचं दुखणं सतावतं. बैठं काम करणाऱ्या लोकांना तसंच व्यायामाचा अभाव असणाऱ्यांना पाठीच्या दुखण्याचा त्रास होतो. हे अत्यंत सर्वसामान्य असं दुखणं आहे. या दुखण्याच्या उगमाबाबत नेमकेपणाने काहीच सांगता येणार नाही. पण पाठीच्या चकत्यांशी संबंधित विकार, स्पायनल आर्थरायटिस तसंच स्नायूंशी संबंधित समस्यांमुळे पाठीचं दुखणं उद्भवू शकतं. यासोबतच पाठीच्या दुखण्याला इतर काही गोष्टी कारणीभूत ठरू शकतात. पाठीच्या दुखण्याची कारणं जाणून घेतली तर तुम्हाला नक्कीच धक्का बसेल. या कारणांबद्दल आपण अनभिज्ञ असतो. पाठीच्या दुखण्याच्या कारणांविषयी जाणून घेऊ या.



✻ पाठीच्या दुखण्याचे तीन प्रकार आहेत. पाठीच्या वरच्या भागाचं दुखणं, खालच्या भागाचं दुखणं आणि मधल्या भागाचं दुखणं.

✻ धूम्रपान करणाऱ्यांना पाठीच्या दुखण्याचा त्रास होऊ शकतो. धूम्रपान करणाऱ्यांच्या पाठीची चकती कमकुवत होते. अनेकांच्या हे लक्षातही येत नाही. वाढत्या वयानुसार पाठीच्या कण्यांमधली चकती कमकुवत होत असली तरी धूम्रपानामुळे या प्रक्रियेचा वेग वाढतो. यामुळे तीव्र स्वरूपाची पाठदुखी होते. सिगारेटमधल्या निकोटिनमुळे पाठीच्या कण्याचं नुकसान होतं.

आरोग्यमंत्र

✻ अतिताण पाठीच्या दुखण्याला कारणीभूत ठरू शकतो. खूप ताण घेतल्याने पाठीच्या स्नायूंवरही ताण येतो. यामुळे पाठीच्या खालच्या भागाचं दुखणं मागे लागू शकतं. कालांतराने हे दुखणं वाढू शकतं.

✻ व्यायामादरम्यान किंवा व्यायामानंतर पाठीचं दुखणं वाढू शकतं. सायकलिंग केल्यानंतर पाठीचं दुखणं वाढतं. यामागे बरीच कारणं असतात. व्यायाम करताना थोडी काळजी घेतली तर ही दुखणी टाळता येऊ शकतात. तसंच शरीर ताणण्याचे व्यायामही करता येतील.

✻ शरीराचं वजन झेलून त्याची योग्य पद्धतीने विभागणी करण्याचं काम पाठीचा कणा करतो. त्याचप्रमाणे त्याची रचना केलेली असते. स्थूलपणामुळे पाठीचं दुखणं उद्भवू शकतो. जास्त वजनामुळे पाठीच्या कण्यावर ताण येतो. शरीराचं अतिरिक्त वजन झेलताना कण्याला जास्त मेहनत करावी लागते. यामुळे पाठीचं दुखणं मागे लागू शकतं.

✻ पायांच्या लांबीत फरक असलेल्या लोकांना पाठीच्या दुखण्याचा त्रास होऊ शकतो. पायाच्या लांबीतला अगदी थोडासा फरकही पाठीच्या दुखण्याला कारणीभूत ठरू शकतो.

✻ पाठीच्या स्नायूंना जोडलेल्या इतर स्नायूंना दुखापत झाली तर पाठीचं दुखणं उद्भवू शकतं. पाठीचा कणा आणि स्नायूंच्या आसपास हे दुखणं पसरत जातं आणि वेदनेची तीव्रता वाढते.

नवसंशोधन

### औषधांचा पुनर्वापर ठरतो धोकादायक!

एखादा आजार पुन्हा उद्भवला तर आपण आधीच्या औषधांचा डोस पुन्हा घेतो. सर्दी–खोकला किंवा इतर काही विकारांची उरलेली औषधं कुटुंबातल्या किंवा कुटुंबाबाहेरच्या सदस्यांना देतो. पण हे चुकीचं आहे. अशा प्रकारे उरलेली औषधं देण्यामुळे औषधांना प्रतिकार करणाऱ्या बॅक्टेरियांची क्षमता वाढते आणि प्रतिजैविकांना प्रतिकार करणाऱ्या जंतूसंसर्गाचं प्रमाण वाढतं, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. आपली औषधं दुसऱ्या व्यक्तीला दिल्याने संबंधित व्यक्तीचं आरोग्य धोक्यात येतंच शिवाय संपूर्ण समाजाच्या दृष्टीनेही ही कृती धोक्याची असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.



डोळ्यांचं आरोग्य

### कॉन्टॅक्ट लेन्स की बँडेज?

ऑस्ट्रेलियातल्या संशोधकांनी नव्या औषधी कॉन्टॅक्ट लेन्सचा शोध लावला आहे. ही कॉन्टॅक्ट लेन्स डोळ्यांच्या पृष्ठभागावरच्या जखमांवर बँडेजप्रमाणे उपयुक्त ठरू शकते. या संशोधनामुळे डोळ्यांशी संबंधित दुखापती झालेल्या रूग्णांना दिलासा मिळू शकतो. कॉर्निअल अल्सर तसंच इतर काही विकारांमध्ये कॉन्टॅक्ट लेन्सचा हा गुणधर्म उपयुक्त ठरू शकतो. या लेन्सच्या चाचण्या करण्यात येतील. त्यानंतर सर्वसामान्य रूग्णांसाठी या लेन्स उपलब्ध करून देण्यात येतील.



दंतारोग्य

### कॅविटीला कारणीभूत ठरणारे पदार्थ

लहान मुलांना कॅविटी होण्याची शक्यता बरीच जास्त असते. मुलांच्या आहारात गोडाचं प्रमाण जास्त असतं. आईसक्रीम, केक, चॉकलेट असे पदार्थ मुलं खातात. यामुळे दात किडू शकतात. डबाबंद फळांच्या रसात खूप साखर असते. यामुळे दात किडू शकतात. पॉपकॉर्नमुळेही दातांचं आरोग्य बिघडू शकतं. हे पॉपकॉर्न दातांमध्ये अडकून बसतात. त्यात बॅक्टेरियांची वाढ होते आणि कॅविटी निर्माण होतात. ब्रेड आणि पिनट बटरमधली साखरही घातक असते. ताज्या फळांचे रस, मनुका, स्टार्चयुक्त पदार्थ, सॅलाड ड्रेसिंग, मांसाहार यामुळेही मुलांच्या दातांमध्ये कॅविटी होऊ शकतात.



आजीबाईंचा बटवा

### बहुगुणी धने

धन्यांमुळे पदार्थाला छान चव येते. त्याचप्रमाणे धने आरोग्यदायी असतात. धन्यांमध्ये जीवनसत्त्वं आणि खनिजं मुबलक प्रमाणात असतात. वजन कमी करताना धने उपयुक्त ठरतात. धने मिश्रित पाणी नियमित प्यायल्याने वजन कमी व्हायला मदत होते. धन्यांमुळे हार्मोन्सचं संतुलन राखलं जातं. थायरॉइडमध्ये धने खायला हवे. धने रात्रभर पाण्यात भिजवून ठेवावे. दुसऱ्या दिवशी सकाळी हे पाणी प्यावं. यामुळे मधुमेह नियंत्रणात राहतो. धन्यांच्या सेवनामुळे कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहतं. ॲनिमियावर ते लाभदायी आहेत. तसंच त्वचेलाही यामुळे तजेला मिळतो.



हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय– गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय– जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✻ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11